प्रकरण १ ले

# प्रस्तावना

# प्रस्तावना

## I

*सर्वांनी गाव स्वच्छ करावे । तेथे आरोग्य नांदेल बरवे ।।*
*घाण खतातूनी नवनवे । वैभव येई उदयासी ।।*
*निश्चये ग्राम निर्मावया । प्रचारक हाचि मुख्य पाया ।।*
*ग्रामगीताही याच कार्या । निर्माण केली तुकड्या म्हणे ।।*

ग्रामगीता; संत तुकडोजी

स्वच्छता हे आरोग्य संबंधित सवयींचा व उपाययोजनांचा समूह होय. १९८६ साली जागतिक आरोग्य संघटनेच्या अभ्यास गटाने मानवी विष्ठा आणि सार्वजनिक द्रवकचऱ्याची आरोग्यकारक पध्दतीने व्यक्तीगत किंवा सार्वजनिक आरोग्याला धोका न पोहोचेल अशा तऱ्हेने लावलेल्या विल्हेवाटीची पध्दत म्हणजे स्वच्छता होय.[१]

पूर्वीच्या काळात स्वच्छतेची संकल्पना म्हणजे खड्ड्यामध्ये, चरीमध्ये किंवा पाटीचे संडासद्वारे मानवी विष्ठेची विल्हेवाट लावणे; परंतु आधुनिक काळात स्वच्छता या संकल्पनेला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. सर्वसाधारणपणे या संकल्पनेत आता सात गोष्टींचा समावेश होतो.

**संपूर्ण स्वच्छतेचे घटक**

१) मानवी विष्ठेची सुरक्षित विल्हेवाट

२) सांडपाण्याची विल्हेवाट

३) घनकचऱ्याची विल्हेवाट

४) पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, साठवणूक आणि वापर पध्दती

५) गृहस्वच्छता आणि अन्नसंरक्षण

६) पर्यावरण शुध्दता.

७) वैयक्तिक स्वच्छता[२]

पाणी, स्वच्छता, पोषण आणि मानवी विकास या सर्वांमध्ये थेट सहसंबंध अस्तित्वात असतो. दुषित पाणी पिणे, उघड्यावर शौचाला जाणे आणि सांडपाण्याचे नीट नियोजन न करणे यापुढे अनेक रोगांना आमंत्रण मिळते आणि यांच्या दुष्टचक्रात समाज अडकतो. परिणामी समाजाचा आरोग्य निर्देशांक ढासळतो.

रोगजंतू एका बाधीत व्यक्तीकडून दुसऱ्या निरोगी व्यक्तीकडे निरनिराळ्या मार्गांनी प्रसारित होतात. यापैकी अस्वच्छ हात, माशा व इतर कीटक, कोंबड्या, कुत्रे, मांजर यासारखे पाळीव प्राणी, नदी किंवा ओढ्याचे पाणी, शेती हे रोगजंतू प्रसाराचे प्रमुख मार्ग आहेत परंतु या सर्वांचे मूळ मात्र उघड्यावर मलमूत्र विसर्जन हेच होय. जागतिक आरोग्य संघटनेच्या २००१ साली प्रसिध्द झालेल्या अहवालानुसार जगातील एकूण बाल मृत्यूपैकी २/३ बालमृत्यू स्वच्छतेच्या अभावी निर्माण झालेल्या हागवण व श्वसनमार्ग जंतूसंसर्गामुळे होतात. भारतामध्ये अतिसारामुळे दरसाल ५ वर्षांखालील ४ ते ५ लाख मुलांचा अकाली मृत्यू होतो. खरोखरच ही गोष्ट देशाच्या दृष्टीने अतिशय लाजिरवाणी आहे. विष्ठेची आरोग्यपूर्ण विल्हेवाट, उघड्यावर शौचाला बसण्याच्या पध्दतीचे संपूर्ण निर्मूलन, हाताची व पाणी वापराच्या पध्दतीतील स्वच्छता या साध्या-साध्या उपायांनी आपण लाखो निष्पाप बालकांचा दुर्दैवी अकाली मृत्यू टाळू शकतो.[३]

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते ग्रामीण भागातील ८०टक्के रोग दूषीत पाणी व अस्वच्छता यामुळे होतात. अतिसार, कॉलरा, विषमज्वर, कावीळ, पोलिओ, नारू इ. साथीचे रोग लहान मुले व महिलांच्यामधील कुपोषण व रक्तक्षय याचे कारण गोल चपटे व आकडीचे कृमी हे असते. या कृमींचा प्रसार उघड्यावर शौचाला जाणे व दूषित पाणी यामुळे होतो. वैयक्तिक अस्वच्छता व सार्वजनिक अनारोग्य यामुळे खरूज, नायटा, गजकर्ण इत्यादी संसर्गजन्य त्वचारोग गावामध्ये पसरतात. केवळ महाराष्ट्रात १९९६ ते २००० या काळात प्रदुषित पाणी व अस्वच्छ परिसर यामुळे २८१३ मृत्यू घडून आले ३४.१७ लाख व्यक्तींना विविध जलजन्य आजारांची लागण झाली.

याचकाळात ७५ लाख शालेय विद्यार्थ्यांच्या तपासणीत दूषित पाणी, अस्वच्छ परिसर व वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव यामुळे १ लाख (१.२ टक्के) मुले कृमी दोषाने, ७ लाख (९.३३ टक्के) मुले दातांच्या रोगाने, २ लाख (२.६७ टक्के) मुले खरजेने व १.५ लाख (२ टक्के) मुले इतर साथीच्या रोगामुळे बाधित असल्याचे आढळते.[४]

### १.१.१. प्राचीन भारतातील स्वच्छताविषयक उल्लेख

प्राचीन काळापासून वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य यांचे संदर्भ पहायला मिळतात. प्राचीन भारतातील मोहेंजोदडो, हडाप्पा, लोथल व धौलावीरा येथील उत्खननामध्ये ५००० वर्षांपूर्वीच्या लोकांनी बांधलेली स्नानगृहे व गटारीचे बांधकाम आढळून आलेले आहेत. लोथल या ठिकाणी तर सांडपाण्याची अंतिम विल्हेवाट लावणाऱ्या प्रचंड मोठ्या विहीरींचे अस्तित्व सापडले आहे. परंतु या संस्कृतीमध्ये शौचालय बांधणीचे पुरावे मात्र आढळून आलेले नाहीत.

प्राचीन काळातील स्मृती आणि पुराण वाङ्मयात शौच अशौच विधींबाबत काही निषेध आज्ञा आढळतात. उदा. पाराशर स्मृतीमध्ये गावाच्या जवळपास मलमूत्र विसर्जन न करता पहाटे उठून गावापासून दूर जाऊन मलमूत्र विसर्जन करावे असे सुचविले आहे.

मनुस्मृतीमध्येदेखील जलप्रदूषण व भूमीप्रदूषण टाळण्यासाठी तसेच प्राण्यांच्याद्वारे रोगप्रसार होऊ नये म्हणून नांगरलेल्या शेतात, पाण्यात, पर्वतावरील कुरणात, तळ्यात, गोठ्यात, नदीकाठावर किंवा गाईसमोर मलमूत्र विसर्जन करू नये असा आदेश दिला आहे. याज्ञवल्क्य स्मृतीने तर उष्ट खरकटे अन्न व माणसाचे मलमूत्र यांची योग्य विल्हेवाट लावण्याचा आदेश दिला आहे.

अंगीरसस्मृतीने गावापासून दूर मलमूत्र विसर्जन करण्याचा सल्ला दिला आहे. अशाप्रकारे विविध स्मृतीग्रंथांनी मलमूत्र विसर्जनाबाबत आदेश दिले असले तरी प्राचीन काळात लोक उघड्यावरच मलमूत्र विसर्जन करीत असत असे आढळून आले. ऐतिहासिक काळात मात्र काही किल्ल्यांच्या मधून शौचालयासाठी बंदिस्त जागा आढळून आलेल्या आहेत. अनेक नगरांच्या मधून उच्च वर्णियांच्या वस्त्यातून पाटीचे संडास आढळत असत.[५]

### १.१.२. ब्रिटीश काळातील स्वच्छता व आरोग्य कार्यक्रम

इ. स. १८५७ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य संपुष्टात येऊन ब्रिटीश सरकारचा अंमल भारतात सुरू झाला. त्यावेळेपासून त्यांनी स्वच्छतेच्या संदर्भात एका आयोगाची स्थापना केली. या आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतातील सार्वजनिक स्वच्छतेवर विशेष भर देण्याची शिफारस केली होती. ही शिफारस ब्रिटीश सरकारने मान्य केली व पुढील ४० वर्षे तिच्या अंमलबजावणीचा प्रयत्न केला. त्यानंतर एका नव्या सॅनिटरी कमिशनची स्थापना करण्यात आली. या कमिशनने भारतातील सार्वजनिक स्वच्छतेबाबत अनेक उपाय सुचविले. इ. स. १९११ पर्यंत मध्यवर्ती ब्रिटीश शासनाने स्वच्छतेच्या कार्यावर पूर्ण नियंत्रण होते. परंतु १९११ च्या रिफॉर्म ॲक्टनंतर सदर विषय केंद्राकडून राज्यांकडे सोपविण्यात आला व कार्यक्रमातील सुसूत्रता कमी झाली.[६]

ब्रिटीश कालखंडात शासकीय पातळीवरील स्वच्छतेच्या उपाययोजनांबरोबरच काही स्वयंसेवी संस्था, संघटना, समाजसुधारक व्यक्तींनी देखील सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता याबाबत ग्रामीण भागात अनेक प्रयोग राबविले. दुर्दैवाने त्यांचे सार्वत्रिकीकरण होऊ शकले नाही.

### १.१.३. श्रीनिकेतन प्रकल्प

बंगालमधील विरभूम जिल्ह्यातील श्रीनिकेतन येथे नोबेल पारितोषिक विजेते कवि रविंद्रनाथ टागोर यांनी ग्रामीण विकासाचा प्रकल्प सुरू केला म्हणून त्यांना ग्रामीण पुनर्रचनात्मक कार्याचे जनक असे म्हटले जाते. त्यांनी या प्रकल्पात १) ग्रामीण कल्याण २) कृषी विभाग ३) उद्योग ४) शिक्षण अशा चार विभागाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला.

त्यांनी ग्रामीण कल्याण विभागांतर्गत सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य या संदर्भात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

### १.१.४. फिरका विकास योजना

१९०६ साली मद्रास राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी फिरका विकास योजना या नावाने ग्रामीण विभागाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक विकास घडवून आणण्यासाठी योजना सुरू केली. या योजनेत खेड्यातील स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले.

व त्यासाठी लोकांना आरोग्यविषयक शिक्षण देण्याची तरतूद केली होती. पुढे सन १९५४ मध्ये या योजनेला राष्ट्रीय विस्तार सेवेत समाविष्ट करण्यात आले.

### १.१.५. गुरगाव प्रकल्प

एल. एन. ब्रायन यांनी पंजाब प्रांतातील गुरगाव जिल्ह्यात १९२७ मध्ये ग्रामीण विकासाची एक योजना सुरू केली. या योजनेस गुरगाव प्रकल्प असे म्हणतात. त्यांनी प्रबोधनातून लोकांचे वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्य सुधारण्यावर भर दिला. गावातील काडीकचऱ्याचे उच्चाटन करून कंपोष्ट खत तयार करणे व वायुवीजनाला अनुकूल अशी घरे बांधणे या गोष्टींना प्राधान्य दिले. श्री. ब्रायन हे गुरगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते व प्रकल्प शासकीय स्वरूपाचा होता त्यामुळे तो बऱ्याच अंशी यशस्वी झाला.

### १.१.६ मात्थाँडम प्रकल्प

इ.स. १९२८ मध्ये केरळ राज्यातील मात्थाँडम येथे यंग मेन्स ख्रिश्चन असोशिएशन या संस्थेच्या वतीने डॉ. स्पेन्सर हॅच यांनी ४६ खेड्यामध्ये ग्रामीण विकासाचे कार्य सुरू केले. या कार्यामध्ये कुटीरोद्योग, सहकारी संस्थांची स्थापना, रात्रीच्या शाळा आणि फिरती वाचनालये याबरोबरच दुर्गंधीमुक्त शौचालये बांधण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. परंतु हे त्यांचे कार्य फक्त ख्रिश्चन समाजापुरतेच मर्यादित होते.[७]

### १.१.७. महात्मा फुलेंचे कार्य

१९ व्या शतकातील थोर समाजसेवक महात्मा फुले यांना स्वच्छतेचे भरपूर आकलन झाले होते. त्यांना अस्वच्छता, रोगराई, अपमृत्यू यांचा स्वच्छतेशी सहसंबंध ज्ञात होता. त्यामुळे त्यांनी लिहिलेले स्वच्छताविषयक अखंड व शेतकऱ्याचा आसूड लिखाण पाहिल्यास फुल्यांनी लोकांच्यामध्ये वर्तनबदल घडवून आणण्यासाठी खूप प्रयत्न केले, त्यांनी आपल्या लिखाणामध्ये शेतकऱ्याचे घर व परिसरातील अस्वच्छता व अनारोग्याचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या अखंडामध्ये शरीराची व वस्त्रांची स्वच्छता ठेवली नाही तर अनेक रोग जडतात. तसेच अनेक त्वचा रोग होतात हे सांगितले आहे.[८]

## १.१.८. महात्मा गांधी यांचे स्वच्छताविषयक कार्य

महात्मा गांधी यांनी इ. स. १९३८ मध्ये वर्धा शहराजवळील शेगाव या खेड्यामध्ये सेवाग्राम आश्रमाची स्थापना केली. महात्मा गांधी यांची ग्रामीण विकासाबाबतची संकल्पना अत्यंत अभिनव व मूलगामी स्वरूपाची होती. त्यांनी स्वच्छता व आरोग्य या बाबीला प्रथम प्राधान्य दिले. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत रस्ते झाडून स्वच्छता करण्यास सुरूवात केली. तसेच विशिष्ट ठिकाणीच मलमूत्र करावे व त्यावर राख किंवा माती टाकावी म्हणजे दुर्गंधी व जंतूप्रसार रोखता येईल असे सांगितले. महात्मा गांधीनी जेथे जाईल तेथे मानवी विष्ठेच्या सुरक्षित विल्हेवाटीसाठी 'टट्टी पे मिट्टी' असा संदेश दिला. याबरोबरच ग्रामीण पुनर्रचनेसाठी अनेक संस्था व संघटना स्थापन करून ग्रामीण भागातील स्वच्छता व आरोग्यविषयक शिक्षणाला चालना दिली. गांधीजींच्या देशभरातील कार्यकर्त्यांनी गांधीजींचे राजकीय नेतृत्व स्विकारले पण त्यांच्या भंगी मुक्ती, अस्पृश्यता निवारण, ग्रामीण स्वच्छता व आरोग्य या विषयांच्या क्रांतिकारी विचारांना फाटा दिला.[९]

महात्मा गांधीजींनी सफाई, व्यक्तिगत स्वच्छता, ग्रामसफाई, शहरातील सफाई यासंबंधी मौलिक विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते शाळामध्ये सर्वप्रथम स्वच्छता व सफाई या गोष्टी शिकविल्या जाव्यात. कारण यामध्येच बाकीचे शिक्षण येत असते. गावाची स्वच्छता नियमितपणे केली तर गावातील आजार कमी होतील. आजारांपेक्षा आजार प्रतिबंधक गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण स्वच्छतेमध्ये तळी, विहीरी, स्वच्छ ठेवणे, रस्ते व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे, टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तूंची निर्मिती करणे यावर भर दिला पहिजे तसेच ग्रामीण लोकांनी जर स्वखुशीने लक्ष दिले तर आरोग्यासाठी लागणारा खर्च आपोआप कमी होईल. शौचासाठी उघड्यावर न बसता शेतामध्ये चर खणून त्यामध्ये मैला टाकला तर त्याचे शेतीसाठी चांगल्या प्रकारचे खत तयार होईल. त्यामुळे शेतीचे उत्पन्नदेखील वाढेल. गावात रोगजंतू होणार नाहीत व पर्यायाने गाव स्वच्छ राहू शकेल अशी त्यांची विचारसरणी होती. त्यांनी ग्रामस्वच्छतेबद्दल केवळ विचार न मांडता

सेवाग्रामसारख्या अनेक संस्था स्थापन करून प्रत्यक्ष सफाई करण्याचे व स्वच्छता ठेवण्याचे कार्य केले आहे.[१०]

### १.१.९. संत गाडगेबाबा यांचे कार्य

संत गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यामध्ये झाला. आपले जिवीत कार्य म्हणून त्यांनी अज्ञान, अंधश्रद्धा, दुष्ट प्रथा व परंपरा तसेच दारिद्र्य व पशूहत्या यांच्याविरूद्ध लढा पुकारला होता. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यांतील लोकांमध्ये स्वच्छतेच्या व सामाजिक बाबीबाबत जनजागृती करण्यासाठी त्यांनी भजन व किर्तन या लोकप्रिय माध्यमांचा वापर केला. त्यांच्या किर्तनातून बंधुभाव, गावातील ऐक्य, सावकारी पाशापासून दूर राहणे, मुलांचे शिक्षण आणि प्राणी जिवाप्रती दयाभावना यांचा प्रचार करीत ते स्वत: निरक्षर असले तरी शिक्षणाचे जीवनातील उच्चतम स्थान त्यांना पूर्णत: पटले होते, त्यामुळे त्यांनी आयुष्यभर शिक्षणप्रसारावर भर दिला. तसेच ते सामाजिक समानता, मानवी मूल्यांचे आचरण, गरजूंना मदत या बाबी तसेच हातात झाडू घेऊन लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊन समाजाचे प्रबोधन करत. स्वच्छता, प्रामाणिकपणा व परोपकार वृत्ती या तीन बाबी भोवती त्यांचे प्रचार कार्य फिरत होते.

संत तुकडोजी महाराजांच्या पूर्वी सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व गाडगेबाबांनी आपल्या कृतीतून लोकांना पटवून देण्यासाठी आयुष्यभर महाराष्ट्रभर फिरून आपल्या किर्तनातून स्वच्छता संवाद साधला. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचे ते सर्वात मोठे व यशस्वी प्रचारक होते. त्यांनी आपल्याबरोबर ग्रामीण स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि शिक्षण या क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांचे मोहोळ तयार केले. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने संपूर्ण स्वच्छता अभियानास संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान असे नाव दिले.[११]

### १.१.१०. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य

अमरावती जिल्ह्यातील शहीद यावली गावात जन्मलेले बंडोजी उर्फ नामदेव गणेश पंत इंगळे ठाकूर हे संत तुकडोजी किंवा तुकड्यादास या नावाने प्रसिद्ध झाले. स्वच्छता व आरोग्यासंबंधात त्यांनी केलेले काम हे माहिती, शिक्षण व संवादाचे अत्यंत उत्कृष्ट उदाहरण

आहे. ग्रामस्वच्छता, तिचा आरोग्याशी असलेला संबंध, जंतूप्रसार आणि अपमृत्यू याबाबत संपूर्ण शास्त्रीय माहिती लोकभाषेत व गेय स्वरूपात मांडली आहे. ग्रामगीतेच्या १४ व्या अध्यायात ते म्हणतात,

*चहूबाजूंनी केली घाण । त्यात जंतू झाले निर्माण ।।*
*त्यातूनी रोगांच्या साथी भिन्न भिन्न वाढ घेती ।। १४.८।।*
*नाही नेमाचा आचार । शुद्ध नाही आहार विहार ।।*
*अशुद्ध हवा पाणी संहार । करिती जनांचा ।। १४.९ ।।*
*कशास काही नियम नुरला । कोणी रोगी कोठे थुंकला ।।*
*कोठे जेवला संसर्गी आला । गोंधळ झाला सर्वत्र ।। १४.१२ ।।*
*त्याने रोगप्रसार झाला । लागट रोग वाढतचि गेला ।।*
*बळी घेतले हजारो लोकाला । वाढोनी साथ ।। १४.१३ ।।*

वरील अभंगामध्ये स्वच्छतेमुळे होणारे प्रदुषण संसर्गजन्य रोग व रोग साथी याबद्दल प्रबोधन केले आहे. परंतु संत तुकडोजी महाराज यावरच थांबत नाहीत तर ते स्वच्छतेतून खतनिर्मिती व त्यातून ग्रामसमृद्धी असे तत्त्वज्ञान सांगतात.

*मूत्र विष्टा हड्डी मिसळली । त्याने भूमीस स्फूर्ति चढली ।।*
*पुन्हा पेरणी करता उद्‌भवली । प्रचंड कणसे ।। १२.६४ ।।*
*म्हणोनी सर्व गावचे मलमूत्र । जमवोनी झाकावे जाणोवी मंत्र ।।*
*त्याने गावाची जमीन सर्वत्र । खतवोनी घ्यावी*
*याने दूर होईल जमीन घाण । थांबेल रोगराईचे नुकसान ।।*
*आणि पिकेल अधिक धान्य । अनेक लाभ एकामाजी ।। १२.६४ ।।*

तुकडोजी महाराजांनी सार्वजनिक स्वच्छतेशी वैयक्तिक स्वच्छता व गृहस्वच्छता यांना जोडून दिले.

*गाव व्हावया निरोगी सुंदर । सुधारावे लागेल एक-एक घर ।।*
*आणि त्यातून ही घरात राहणार । करावा लागेल आदर्श ।। १४.२२ ।।*

तुकडोजी महाराजांनी स्वच्छता कार्यक्रम व ग्रामविकास यामध्ये संवादकाचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.

*निश्चये ग्राम निर्मविया। प्रचारक हाची मुख्य पाया ।।*

*ग्रामगीता ही याच कार्या। निर्माण केली तुकड्या म्हणे ।। १७.११५।।* [१२]

### १.१.११. सेनापती बापट यांचे कार्य

सेनापती बापट हे महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित झालेले कृतीशील व्यक्तीमत्व होते. स्वत: हातात झाडू घेवून ४० वर्षे दररोज सार्वजनिक स्वच्छतेचा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सफाई पथके तयार करून आरोग्यविषयक जागृती केली होती. प्रत्येकाने साफसफाई करून केरकचरा गोळा करावा, आपले घर व परिसर स्वच्छ करावा व सर्वांनी आरोग्यसंपन्न रहावे असे त्यांचे विचार होते. त्यांनी झाडू अष्टक, आरोग्याची ध्वजा अशा अनेक काव्यातून त्यांनी सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य महाराष्ट्रात केले आहे.[१३]

### १.१.१२. अप्पासाहेब पटवर्धन यांचे कार्य

अप्पासाहेब पटवर्धन यांनी गांधीजींच्या विचारांचा व कार्याचा वारसा घेवून स्वच्छतेचे कार्य सुरू ठेवले. म्हणून त्यांना कोकणचा गांधी असे म्हटले जाते. त्यांनी कोकणात स्त्रियांच्या संस्था व संघटना निर्माण केल्या. त्यांनी कणकवली येथे निर्माण केलेल्या गोपुरी आश्रम येथे शौचालयाच्या बाबतीत अनेक मूलभूत प्रयोग केले.

स्वच्छ कणकवली या उपक्रमामध्ये ते स्वयंसेवकाच्या सहकार्याने संडास, मुताऱ्या रस्ते व उकीरडे साफ करीत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी भंगीमुक्ती आंदोलनाला मोठी चालना दिली होती. त्यांच्या प्रयत्नातून व विचारातून गोपुरी संडास ही संकल्पना जन्मास आली. त्रिभुवनदास शहा यांच्या सहकार्याने त्यांनी सफाईचे एक शास्त्रच बनविले. त्याचे प्रशिक्षण ते आपल्या गोपुरी आश्रमात देत असत. महाराष्ट्रातील अनेक कार्यकर्ते सफाईचे शिक्षण घेण्यासाठी गोपुरी आश्रमात येत असत. या प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष सफाई आणि सफाईचा प्रचार करून स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटवून देत असत. याचबरोबर

त्यांनी सफाई दर्शन नावाचे एक मासिक सुध्दा सुरू केले होते व अखिल भारत सफाई मंडळ नावाची संस्था स्थापन केली होती. या मंडळाला सर्व भारतातून सभासद मिळाले होते.

पटवर्धनांच्या मते साफसफाई हे काम एखाद्या यज्ञव्रतासारखे महत्त्वाचे व पावित्र्याचे होते आणि याच भावनेतून त्यांनी हे कार्य राबविले. याशिवाय ग्रामीण विकासासाठी अनेक विविध संस्थांना तयार करण्याचा प्रयत्न आप्पासाहेब पटवर्धन यांनी केला होता.[१४]

### १.१.१३. गांधी स्मारक निधीचे कार्य

महात्मा गांधी यांनी ग्रामविकास व ग्रामस्वराज्य या आपल्या संकल्पनांमध्ये ग्रामसफाई व अंत्योदय या कामाला सर्वाधिक महत्व दिले होते. त्यांच्या मते स्वावलंबनावर आधारलेली मनुष्यकेंद्री आणि पिळवणूक विरहीत आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यामध्ये ग्रामसफाईला अत्यंत महत्त्व आहे. एका माणसाने दुसऱ्या माणसाला स्वत:च्या डोक्यावरून मैला वाहून नेण्यास भाग पाडणे हा मनुष्यकुळाचा अपमान आहे. म्हणून त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना भंगी मुक्तीचा आदेश दिला. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी ठक्कर बाप्पा, डॉ. आंबेडकर, मामासाहेब फडके, जुगतराम दवे, बाबुलभाई मेहता, मन्सुखलाल जोबनपुत्र, शिवभाई पटेल, श्रीमती रामेश्वरी नेहरू, परीक्षीतलाल मुजूमदार, कृष्णदास शहा, वल्लभस्वामी, जीवनलाल जयराम दास, एन आर मल्कानी, वियोगी हरी भाऊ नार्वेकर, अप्पासाहेब पटवर्धन या विचारवंत कार्यकर्त्यांनी १९५६ मध्ये दिल्ली येथे गांधी स्मारक निधीची स्थापना केली. या निधीचे अध्यक्ष मामासाहेब देवगिरीकरसाहेब होते. या निधीची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे –

१) डोक्यावरून मैला वाहून नेण्याची लाजिरवाणी प्रथा बंद करून भंगी समाजाची मुक्तता करणे.

२) लोकांना आणि विशेषत: महिलांना नैसर्गिक विधीसाठी स्वतंत्र व आरोग्यपूर्ण सोय असलेले शौचालय पुरविणे.

३) मानवी विष्ठेचा खत निर्मितीसाठी उपयोग करणे.

४) गावामध्ये सर्वसाधारण स्वच्छता राखणे.

वरील उद्दिष्टांसाठी अप्पासाहेब पटवर्धन यांनी अनेक कार्यक्रम केले. ह्यातूनच power flush Aqua privy आणि सोपा संडास यांची निर्मिती करण्यात आली. निधीने तयार केलेल्या संडासाची किंमत केवळ ३०० होती. अशाप्रकारे गांधी स्मारक निधीचे कार्य अत्यंत चांगले चालले. हा प्रत्यक्षात स्वतंत्र भारतातील पहिला ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम होता.[१५]

### १.१.१४. सुलभ इंटरनॅशनल संस्थेचे कार्य

सन १९७० मध्ये सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑरगनायझेशन या स्वयंसेवी संस्थेची स्थापना डॉ. बिंदेश्वरी पाठक यांनी केली. या संस्थेने अल्पावधीतच ग्रामीण स्वच्छतेच्या कार्याची व्याप्ती देशभरात व परदेशातही वाढविली. डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या घृणास्पद प्रथेचे निर्मूलन करणे व या घाणेरड्या कामात अडकून पडलेल्या मेहतर समाजाची मुक्तता करून त्यांचे पुनर्वसन करणे हे सुलभ इंटरनॅशनल संस्थेचे प्रमुख उद्दीष्ट होते. आजमितीस सुलभ इंटरनॅशनल ही संस्था भारतातील एक महत्त्वपूर्ण स्वच्छता चळवळ बनली आहे. या संस्थेचे ५०००० स्वयंसेवक भारतातील ४५५ जिल्ह्यात व १०८० शहरात कार्यरत आहेत. याशिवाय नेपाळ, भूतान व बांग्लादेश या शेजारी देशांनीही त्यांना स्वच्छता कार्यक्रमात मदत करण्यासाठी निमंत्रित केले आहे.

सुलभ इंटरनॅशनल या संस्थेने आजपर्यंत १० लाख २० हजार वैयक्तिक शौचालये व ५५०० सार्वजनिक शौचालये तसेच ११७ मानवी विष्ठेवर आधारीत बायोगॅस संयंत्राची उभारणी केली आहे. संस्थेने आतापर्यंत ६०००० भंग्यांना मुक्त केले असून जवळजवळ १ कोटी लोक सुलभ शौचालयाचा लाभ घेत आहेत. सुलभ इंटरनॅशनल संस्थेने शौचालय बांधणीसंदर्भात संशोधन करून पर्यावरण मित्र असणारे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या स्विकारण्यायोग्य व आर्थिकदृष्ट्या परवडणारे शौचालयाचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. सार्वजनिक शौचालये वापरण्यासाठी व त्यांच्या देखभालीसाठी लोकांनी थोडाफार पैसा खर्च केला पाहिजे अशी मनोवृत्ती निर्माण करण्यामध्ये सुलभ इंटरनॅशनला यश आले आहे. त्यामुळे आज झोपडपट्यातील गरीब लोकही कमीतकमी नियमित पैसे भरून सुलभ शौचालयाचा लाभ घेताना दिसतात. हे सुलभने राबविलेल्या संवाद कार्यक्रमाचे यश आहे.[१६]

# II

# राष्ट्रीय व महाराष्ट्र पातळीवरील स्वच्छता कार्यक्रमाचा आढावा

भारतीय राज्यघटनेनुसार ग्रामीण स्वच्छता हा राज्यांच्या सूचीतील विषय आहे. परंतु राष्ट्रीय स्तरावरील आरोग्यविषयक चिंता आणि मानवी विकास सूचीतील देशातील घसरलेले स्थान यांचा विचार करून राज्यांच्या स्वच्छताविषयक प्रयत्नांना केंद्रशासन तांत्रिक व आर्थिक पाठबळ पुरविते. यासाठी खास करून केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

**१.२.१. ग्रामीण स्वच्छता – धोरण व कार्यक्रम**

१९५४ सालामध्ये आरोग्य क्षेत्रामध्ये स्वच्छता कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला व पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमास स्थान मिळाले. या योजनेत केंद्र सरकार राज्यांनी आखलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमास ५० टक्के अनुदान देण्यात आले.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस असे दिसून आले की आरोग्य शिक्षण व लोकसहभाग यांच्या अभावामुळे स्वच्छता कार्यक्रमास योग्य महत्त्व मिळत नाही.[२]

संयुक्त राष्ट्र संघाने १९८० ते ९० हे दशक आंतरराष्ट्रीय पेयजल पुरवठा व स्वच्छता दशक म्हणून जाहीर केले. या अनुषंगाने भारत सरकारने ७ व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत २५ टक्के लोकसंख्येला शौचालय सुविधा पुरविण्याचे उद्दीष्ट ठरविले.[१७]

**१.२.२. केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम**

१९८५ साली ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम हा भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाकडून ग्रामीण विकास मंत्रालयाकडे हस्तांतरीत करण्यात आला. १९८६ साली केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची घोषणा ग्रामीण विकास मंत्रालयाकडून करण्यात आली.

महिलांना नैसर्गिक विधीसाठी आडोसा पुरविणे व ग्रामीण जनतेच्या जीवनाचा दर्जा उंचावणे हे या कार्यक्रमाचे उद्दीष्ट होते.[१८]

केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम हा खालील ४ उद्दीष्टांवर आधारलेला होता.

१) समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दुर्बल घटकांना संपूर्णपणे व प्राधान्याने स्वच्छताविषयक सुविधा पुरविणे.

२) माहिती, शिक्षण व संवादाला स्वच्छता कार्यक्रमाचा एकात्मिक व अपरिहार्य भाग समजणे.

३) वर्तमानकाळातील सर्व सुक्या किंवा पाटीच्या शौचालयांना स्वस्त आणि शास्त्रीय शौचालयामध्ये रूपांतरीत करणे.

४) मानवी विष्ठेची आरोग्यपूर्ण व पर्यावरणीय दृष्टीने विल्हेवाट लावणे.[१७]

हा कार्यक्रम इंदिरा आवास योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना आणि ग्रामीण भूमीहीन शेतमजूर रोजगार हमी योजना यांच्याशी जोडण्यात आला. युनिसेफने घेतलेल्या आढाव्यास अनुसरून या कार्यक्रमाचे १९९१ मध्ये व त्यानंतर १९९३ मध्ये ग्रामीण स्वच्छतेच्या राष्ट्रीय चर्चा सत्रातून प्राप्त सूचनावरून पुनर्रचना करण्यात आली. याचवेळेस आठव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमातील त्रुटी दूर करण्याची योजना आखण्यात आली. या योजनेनुसार प्रत्येक जिल्ह्यात एक आदर्श खेडे विकसित करण्याचे ठरविण्यात आले. ज्या खेड्यात सर्वांना आरोग्यदायक शौचालयाची सोय असेल, कंपोस्ट खड्डे, गटारी, रस्ते सुधारणा, गावातील कार्यालयांना शौचालय सुविधा, तळ्यांची स्वच्छता, हातपंपाभोवतालची स्वच्छता इ. सुधारणा केल्या जातील या योजनेचा उद्देश माहिती, शिक्षण व संवादासाठी एक नमुना घडविणे हा होता. वैयक्तिक शौचालय बांधणीसाठी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना रू. २००० किंवा ८० टक्के अनुदान देण्याचा निर्णयही केंद्रशासनाने घेतला.

१९८५ पासून २००२ पर्यंत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक शौचालयाची भौतिक प्रगती खालील टेबलमध्ये दर्शविली आहे.

सारणी क्र. १.

| योजना | वर्षे | CRSP ग्रा.स्व.का. | MNP किमान गरजा कार्यक्रम | एकूण |
|---|---|---|---|---|
| ६ वी योजना | १९८५-९० | १,६२,१०३ | २,८८,७८५ | ४,५०,८८८ |
| वार्षिक योजना | १९९०-९२ | १,२७,४६१ | ४,१६,४७८ | ५,४३,९३९ |
| ८ वी योजना | १९९२-९७ | १४,०४,४८५ | १९,३८,३१९ | ३३,४२,७८२ |
| ९ वी योजना | १९९७ -०२ | २५,६९,४४८ | २५,४३,०२७ | ५१,१२,५३५ |
| | २००१-०२ | ४२,६३,४९७ | ५१,८६,६४७ | ९४,५०,१४४ |

*(आधार - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार २००६)* [१९]

संयुक्त राष्ट्र संघाच्या पेयजल पुरवठा व स्वच्छता दशकाच्या प्रकाशात सरकारने २५ टक्के जनतेला शौचालय पुरविण्याचे उद्दीष्ट ठरविले होते. परंतु १९९२ च्या अखेरीपर्यंत केवळ २.७३ टक्के लोकांच्यापर्यंतच सदर सुविधा पुरविण्यात यश आले. या संदर्भातील मंद प्रगतीची अनेक कारणे एस. श्रीनिवास यांनी आपल्या ग्रामीण स्वच्छताविषयक व्यवस्थापन अहवालात नमूद केले आहे.[१७]

१९९१ च्या जनगणनेमधून शहरी व ग्रामीण जनतेच्या शौचालय सुविधामधील भीषण दरी दिसून आली. भारताच्या शहरी भागातील ६३.९ टक्के कुटुंबाना शौचालय सुविधा उपलब्ध आहेत पण ग्रामीण भागातील केवळ ९.५ टक्के कुटुंबाना ही सुविधा उपलब्ध आहे. यामध्ये अपवाद केवळ केरळ राज्याचा आहे. तेथे ४४.१ टक्के ग्रामीण कुटुंबाना शौचालय सुविधा उपलब्ध आहे.[२]

वरील आकडेवारीवरून असेही दिसून आले की ७ टक्के ग्रामीण जनतेने वैयक्तिक पुढाकारातून शासनाच्या मदतीशिवाय आपली शौचालये बांधली होती.

९ व्या योजनेनुसार मध्यावर शासनाने केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमामध्ये मूलगामी बदल करण्याची भूमिका घेतली. त्यानुसार उद्दीष्टाधारीत योजनेपेक्षा मागणी आधारीत कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच जास्त सबसिडीकडून कमी सबसिडीकडे प्रवास सुरू

झाला. स्वयंसेवी संस्थांचा, सहकारी संस्थांचा सहभाग आणि शालेय स्वच्छता कार्यक्रम यावर भर देण्यात आला. सन १९९९ मध्ये कार्यक्रमाचे नाव संपूर्ण स्वच्छता अभियान असे संबोधण्यात आले.

सुरूवातीस ६७ जिल्ह्यामध्ये हे अभियान सुरू करण्यात आले. २००१ सालच्या जनगणनेनुसार २१.९ टक्के ग्रामीण कुटुंब आरोग्यदायी शौचालयांचा वापर करीत आहेत. सरकारच्या योजनेनुसार ९ व्या योजनेच्या अखेरीस उद्दीष्ट आधारीत कार्यक्रम संपूर्णपणे बंद करण्यात आला व सर्व देशभर संपूर्ण स्वच्छता अभियान या लोक चळवळीची सुरूवात १९९९मध्ये करण्यात आली.[२०]

### १.२.३. संपूर्ण स्वच्छता अभियान

१९९९ मध्ये भारतातील ६७ जिल्ह्यात पथदर्शी स्वरूपात या अभियानाची सुरूवात झाली. या अभियानाचे स्वरूप प्रामुख्याने मागणी आधारीत असल्याने जिल्हापरिषदांना आपापला अभियान प्रकल्प खर्चाच्या अंदाजपत्रकासह तयार करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार विविध जिल्हापरिषदांनी आपापल्या जिल्ह्यातील सामाजिक, भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विचार करून आपापले प्रकल्प तयार करून केंद्रशासनास सादर केले. त्यानुसार भारत सरकार व राज्यसरकार यांनी आपापला वाटा उचलून जिल्ह्याला अभियान अनुदानाची रक्कम हस्तांतरीत केली. १९९९ सालात महाराष्ट्रातील चार जिल्ह्यात हे अभियान पथदर्शी स्वरूपात राबविण्यात आले. आज महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व म्हणजे ३३ जिल्ह्यात हे अभियान राबवले जात आहे. या अभियानातील महत्त्वपूर्ण घटकांचा विचार या पुढील भागात करण्यात आला आहे.

### १.२.४. संपूर्ण स्वच्छता अभियानातील मूलभूत तत्त्वे

१) मागणी आधारीत अभियान

२) लोकांनी चालविलेले लोककेंद्री अभियान

३) सरकारी प्रकल्पाऐवजी लोकचळवळीचा दृष्टीकोन

४) माहिती, शिक्षण व संवाद या गोष्टीस सर्वाधिक महत्त्व

५) पर्यायी वितरण व्यवस्था

६) शालेय स्वच्छता कार्यक्रम व आरोग्य शिक्षण यांना सर्वोच्च प्राधान्य

**१.२.५. संपूर्ण स्वच्छता अभियानाची उद्दीष्टे**

संपूर्ण स्वच्छता अभियानाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे

१) देशाच्या ग्रामीण भागातील जीवनमानाची गुणवत्ता उंचावणे.

२) देशाच्या ग्रामीण भागात स्वच्छता कार्यक्रमाची व्यापकता वाढविणे.

३) जाणीव जागृती आणि आरोग्यविषयक शिक्षण यातून स्वच्छतेच्या सुविधांची मागणी निर्माण करणे.

४) देशाच्या ग्रामीण भागातील शाळा आणि अंगणवाड्यातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक शिक्षण देणे व स्वच्छतेच्या सवयी लावणे.

५) स्वच्छतेच्या कमी खर्चाच्या आणि योग्य तंत्रांना प्रोत्साहन देणे.

६) पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व अन्नपदार्थांचे प्रदूषण कमी करण्यासाठी उघड्यावर मलमूत्रविसर्जन करण्याच्या पध्दतीचे निर्मूलन करणे.

**१.२.६. भूमिका**

हे अभियान लोकाभिमुख आणि लोकसहभागावर आधारीत करणे ही यामागची भूमिका आहे. मागणी आधारीत अंमलबजावणी हा दृष्टीकोन स्विकारताना जाणीव जागृती, शाळा व घरातील वापरासाठी स्वच्छतेच्या सोयी आणि स्वच्छ पर्यावरणावर भर दिलेला आहे. समाजाच्या गरजा पुरविण्यासाठी पर्यायी यंत्रणा स्वीकारल्या जातील. प्रत्येक कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालयासाठी अनुदान देण्यापेक्षा गरीबातील गरीब कुटुंबाला प्रोत्साहनात्मक बक्षीस म्हणून ते दिले जाईल. ग्रामीण भागात शालेय स्वच्छता कार्यक्रम हा महत्त्वाचा घटक आहे आणि गावकऱ्यांना मोठ्या प्रमाणात या स्वच्छता कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी तो प्राथमिक कार्यक्रमाप्रमाणे आवश्यक आहे. लोकांच्या आणि स्थानिक गरजेप्रमाणे तांत्रिक सुधारणा, माहिती, शिक्षण आणि प्रसारावर आधारीत अभियानात पंचायती राज, सहकारी संस्था, महिला मंडळ, बचत गट आणि स्वयंसेवी संस्था यांचा

सहभागही अत्यंत आवश्यक आहे. स्वच्छता आणि आरोग्याच्या सवयी सुधारणे आणि त्या सवयींना अनुरूप असणाऱ्या बांधकामाच्या परवडणाऱ्या आणि उपलब्ध होवू शकणाऱ्या सुविधा अनेक उपलब्ध तंत्रामधून निवडून सर्व ग्रामीण स्तरावर स्वच्छता सुविधांच्या योग्य वापरासंबंधित योग्य ते बदल घडवून आणणे ही या अभियानाची भूमिका आहे.

**१.२.७. अंमलबजावणी**


संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी प्रकल्प तत्वावर केली जाते. प्रकल्पाचा प्रस्ताव जिल्ह्याकडून तयार केला जातो. याची तपासणी राज्य शासन करते आणि नंतर तो केंद्र शासनाला सादर केला जाईल.(पेयजल आपूर्ति विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय) संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी टप्प्याटप्याने होते. प्राथमिक माहिती, शिक्षण आणि प्रसारासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध करून दिली जाते. या अभियानामध्ये विविध स्वयंसेवी संस्था/पंचायत राज्यसंस्था इतर संबंधित संस्था यांच्या सहभागाने स्वच्छता सवयी आणि वापर पध्दतीतील अपेक्षित बदल, स्वच्छता, सुविधांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यायी यंत्रणा, योग्य तांत्रिक बारकावे, तांत्रिक मांडणी व गुणवत्ता यांची पूर्तता करण्यासाठी शासन यंत्रणा व इतर लाभार्थी, परिणामकारक माहिती, शिक्षण आणि संवाद आणि संवादाचा वापर यामध्ये सुसंवाद साधला जाईल.

संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा हा एक घटक आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना निवडक जिल्ह्यांसाठी संपूर्ण स्वच्छता अभियान प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडे मागणी करून त्यांचे सहाय्य मागायचे आहे. एका राज्याला किती प्रकल्प द्यायचे हे राज्याकडून असलेल्या मागणीवर आणि राज्यातील इतर जिल्ह्यात चालू असलेल्या प्रकल्पातील कामांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असेल.

### १.२.८. संपूर्ण स्वच्छता अभियान – घटक आणि कार्ये

**संपूर्ण स्वच्छता अभियानाचे घटक**

संपूर्ण स्वच्छता अभियानामध्ये एकूण प्रमुख घटकांचा समावेश होतो. या घटकांचे स्वरूप व परस्पर संबंध खालीलप्रमाणे –




**१) सुरूवातीची कामे :** स्वच्छता आणि आरोग्याच्या सवयी, लोकांचा त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि स्वच्छतेसाठीच्या सुधारीत सोयीसाठीची मागणी यांचे मूल्यमापन करणारे सर्वेक्षण सुरूवातीलाच करण्यात येईल. केंद्र शासनाकडून सहाय्य मागण्यासाठी या सर्वेक्षणावर आधारीत जिल्हास्तरीय संपूर्ण स्वच्छता अभियानाचा आराखडा तयार करण्यात येईल. सुरूवातीच्या कामांमध्ये मूलभूत सर्वेक्षण, प्रकल्प अंमलबजावणीचा आराखडा, विषयाची पूर्व तोंडओळख करून घेणे, जिल्हा स्तरावरील कार्यक्रम व्यवस्थापकांचे प्रशिक्षण यांचाही समावेश असेल. या कामासाठींचा निधी केंद्र शासनाकडून दिला जाईल. ती रक्कम प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ५ टक्यापेक्षा जास्त नसावी

**२) माहिती, शिक्षण आणि संवाद कामे :** माहिती, शिक्षण आणि संवाद हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे घटक आहेत. या कामातून ग्रामीण भागात घरगुती, शालेय, अंगणवाडी, बालवाडी

आणि सार्वजनिक स्वच्छता सुविधांसाठी मागणी निर्माण होणे अपेक्षित आहे. यामध्ये होणारी कामे विशिष्ट क्षेत्रासाठी असतील आणि गावातल्या सर्व स्तरातून शौचालय बांधणीसाठीची मानसिकता त्यातून तयार होईल. अशा कामासाठी लोकांना प्रोत्साहन आणि प्रेरणा देणाऱ्यांना या रकमेतून मानधन देता येईल. हे मानधन त्यांच्या कार्यक्षमतेवर आधारीत असेल आणि किती कुटुंबाना आणि शाळा, अंगणवाडी येथे शौचालय व शोषखड्डे बांधण्यासाठी आणि त्याचा वापर करण्यासाठी त्यांनी लोकांना प्रवृत्त केले यावर त्याची कार्यक्षमता तपासली जाईल. माहिती, शिक्षण आणि प्रसारामध्ये आरोग्यआणि प्रसारात सार्वजनिक इमारतीच्या भिंतीवर चित्रांवरून किंवा भित्तीचित्र यातून पंचायतींनी हाती घेतलेल्या कामाचे तपशील लोकांपर्यंत पोहोचवावेत.

ग्रामीण स्तरावरून मागणी निर्माण होण्यासाठी आकाशवाणी, दूरदर्शन आणि केबलच्या माध्यमातून दृक–श्राव्य साधनांची निर्मिती करता येईल. यासाठी लागणारा निधी केंद्रशासन आणि राज्यशासन यांकडून ८०:२० याप्रमाणात देण्यात येईल. या कामासाठीचा निधी एकूण प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के पेक्षा कमी असू नये. प्रत्येक जिल्ह्याने समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी धोरण निश्चित केलेली सविस्तर माहिती, शिक्षण व संवाद कृती आराखडा तयार करावयाचा आहे. आरोग्यपूर्ण सवयी हा ग्रामीण जनतेच्या जीवनाचा एक भाग होण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि या कार्यक्रमांतर्गत विकसित केल्या जाणाऱ्या सुविधांची देखभाल, दुरूस्ती, ग्रामस्थांनी करणे हा या संवाद कृती आराखड्याचा प्रमुख हेतू आहे.

या कामासाठी उपलब्ध असणारा निधी गावकऱ्यांना आणि गावातील शाळकरी मुलांना आरोग्यविषयक शिक्षण देण्यासाठी वापरला जावू शकतो.

**३) ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकाने आणि निर्माण केंद्र :** स्वच्छतेच्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि पर्यावरणीय सुविधा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या सामुग्रीची विक्री स्वच्छता साधनसामुग्री दुकानातून केली जाईल. स्वच्छता सुविधा तयार करण्यासाठी लागणारी सर्व सामुग्री आणि साधने या दुकानामध्ये असावीत. हा सामाजिक उद्दिष्ट असणारा उद्योग आहे. स्थानिक गरजा आणि आर्थिक परिस्थिती यानुसार उपलब्ध असणाऱ्या विविध

तांत्रिक पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून त्यासाठी लागणारी साधनसामुग्री व सेवा पुरविणे आणि इतर मार्गदर्शन करणे हे या ग्रामीण स्वच्छता साधनसामुग्री दुकानांचे मुख्य उद्दिष्ट आहे. निर्माण केंद्रातून कमी खर्चाच्या आणि परवडणाऱ्या किंमतीच्या सुविधांची सामुग्री तयार करण्यात येईल. स्वयंसेवी संस्था/बचतगट/महिला मंडळ/पंचायत यापैकी कोणीही असे दुकान किंवा निर्माण केंद्र चालवू शकतात.

**४) कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम :** योग्यप्रकारे बांधून पूर्ण असलेल्या घरासाठी प्राथमिक कमी, खर्चाचे शौचालय (भिंती नसलेले) असावे. ग्रामीण भागात अस्तित्वात असलेल्या सगळ्या पाणी न लागणाऱ्या शौचालयाचा पाणी लागणाऱ्या शौचालयात बदल करणे, ग्रामीण भागातील सर्व कुटुंबे या कार्यक्रमात सहभागी करून घेणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. संपूर्ण गावचा सहभाग मिळविण्यासाठी या कार्यक्रमामध्ये दिला जाणारा प्रोत्साहन निधी गरज वाटत असल्यास दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी वापरता येईल. हे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यांचा योग्य तो वापर या कुटुंबान केल्यानंतर त्याची दखल घेवून त्यांना प्रोत्साहन निधी देता येईल.

या कामाला प्रोत्साहन मिळाल्यामुळे दारिद्र्यरेषेवरील कुटुंब स्वयंस्फूर्तीने वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करतील अशी अपेक्षा आहे. माहिती, शिक्षण आणि प्रसार कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व कुटुंबाचा समावेश असेल. याला कोणताही अपवाद असणार नाही.

**५) सार्वजनिक स्वच्छतागृहे :** संपूर्ण स्वच्छता अभियानात सार्वजनिक स्वच्छतागृह हा महत्त्वाचा घटक आहे. सार्वजनिक स्वच्छतागृह गावातील पुरूष, महिला आणि भूमीहीन कुटुंबाना जाण्याच्या व वापराच्या दृष्टीने सोयीच्या ठिकाणी असले पाहिजे. या स्वच्छतागृहांची देखभाल, दुरूस्ती फार महत्त्वाची असून त्यांची अंतिम जबाबदारी ग्रामपंचायतीने घ्यावयाची आहे किंवा त्यासाठी गावपातळीवर पर्यायी व्यवस्था करावयाची आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहासाठी जास्तीत जास्त २ लाख रूपये एवढी रक्कम मान्य केलेली आहे. पण याचे तपशीलवार चित्रांकन आणि आराखडा सादर केल्यानंतर राष्ट्रीय योजना मान्यता समितीकडून त्याला मान्यता दिली जाईल. यातील खर्चाची विभागणी केंद्र शासन व

राज्य शासन आणि गावाकडून ६०:२०:२० या प्रमाणात केली जाईल. लोकवर्गणीची रक्कम गावकऱ्याऐवजी ग्रामपंचायतदेखील भरू शकते. यासाठी होणाऱ्या खर्चाला कुठलीही मर्यादा नाही. पण केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या रक्कमेच्या ६० टक्के एवढाच खर्च सार्वजनिक स्वच्छतागृह आणि वैयक्तिक शौचालयासाठी झाला पाहिजे. सर्वसाधारणपणे ज्या गावामध्ये वैयक्तिक शौचालये बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसेल आणि गावातील लोकच देखभाल दुरूस्तीची जबाबदारी घेण्यास तयार असतील तर सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली जावीत. या कार्यक्रमाचा मुख्य भर ग्रामीण जनतेला आरोग्यविषयक सवयींचे शिक्षण देणे आणि वैयक्तिक शौचालय बांधणे यावर आहे आणि जेथे वैयक्तिक शौचालय बांधणे शक्य नसेल तेथेच सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली जावीत. गावात सार्वजनिक ठिकाणी तसेच जेथे बाजारासारख्या ठिकाणी जेथे खूप लोक एकत्र येतात अशा जागी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधता येतील.

**६) शालेय स्वच्छता आणि आरोग्यशिक्षण :** लहान मुले नवीन कल्पना स्विकारायला अधिक मोकळी असतात. उघड्यावर शौचास बसू नये यासाठी लहान मुलांची मानसिकता बदलण्यासाठी लागणारे प्रोत्साहन व त्याविषयीचे शिक्षण देण्यास शाळा/अंगणवाडी ही योग्य माध्यमे आहेत. शाळेत शिक्षकांकडून मिळालेले स्वच्छतेचे धडे मुले अंगिकारतील आणि ते सहजच पालकांपर्यंत जावून पोहोचतील. त्यामुळे पालकांच्या मानसिकतेतही बदल होवून तेदेखील स्वच्छतेच्या चांगल्या सवयी स्विकारतील. त्यामुळे शालेय स्वच्छता हा संपूर्ण स्वच्छता अभियानाचा फार महत्त्वाचा घटक आहे. शासकीय, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये आणि अंगणवाड्यांमध्ये स्वच्छतागृहे बांधली जावीत. शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधण्यावर भर दिला जावा.

स्वच्छतागृहांच्या बांधकामाबरोबरच आरोग्यविषयक सर्व माहिती मुलांना देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेतील किमान एका शिक्षकाला आरोग्यविषयक बाबींचे प्रशिक्षण देण्यात यावे. त्या शिक्षकाने मुलांमध्ये आवड निर्माण होईल अशा मनोरंजक पध्दतीने आणि काही सामाजिक प्रशिक्षणाद्वारे त्यांना चांगल्या आरोग्यविषयक सवयींचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

**७) अंगणवाडी स्वच्छतागृहे :** मुलांना अगदी लहानपणापासूनच चांगल्या सवयी लावण्यासाठी अंगणवाडी हे माध्यम उपयुक्त आहे. तिथे येणाऱ्या मुलांच्या आईमध्येही चांगला बदल घडून येण्यासाठी हे शिक्षण उपयोगी आहे. हे उद्दीष्ट पूर्ण होण्यासाठी प्रत्येक अंगणवाडीत लहान मुलांच्या सोयीचे स्वच्छतागृह बांधले जावे.

संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्यविषक जाणीवा जागृत करून गावपातळीवर आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य लक्ष आहे.[२१अ]

**१.२.९. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम १९३६–२००६**

१९३६ : भंगी मुक्ती आंदोलनाची सुरूवात व वर्धा प्रकारच्या शौचालयाचा विकास

१९४३ : सिंगूर येथील ग्रामीण प्रशिक्षण व आरोग्य केंद्र, अखिल भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थान, कलकत्ता यांच्यातर्फे स्वस्त शौचालय बांधणीच्या विकासाच्या संशोधन आराखड्याची सुरूवात. पुनामल्ली रिसर्च इन्स्टिट्युट मद्रास व अहमदाबाद येथील काही संस्थांच्या वतीने कृती संशोधनाची सुरूवात.

१९५१ : ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमास भारत सरकारच्या प्रथम पंचवार्षिक योजनेस स्थान प्राप्त झाले.

१९५३ : सिंगूर (प.बंगाल) येथे दोन खड्याच्या पोअर फ्लश शौचालयाचा विकास व अंमलबजावणीची सुरूवात.

१९७२ : भारत सरकारच्या गतिमान ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची सुरूवात या अंतर्गत दुर्गम भागातील राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांना पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी शंभर टक्के अनुदान.

१९७९ : एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) अंतर्गत ट्रायसेम योजनेखाली ग्रामीण तरूणांना स्वच्छता विषयक बांधकामाचे प्रशिक्षण देण्याची सुरूवात

१९८० : तीव्र उताराच्या शौचालयाच्या भांड्याची निर्मिती

१९८१ : १) जनगणना अहवालानुसार केवळ एक टक्के लोकांना शौचालय सुविधा असल्याचे सिध्द झाले.

२) संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने १९८१ ते १९९० पाणीपुरवठा व स्वच्छता दशक म्हणून जाहीर.

३) संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) आणि जागतिक बँकेच्या वतीने स्वस्त शौचालय तंत्रज्ञान विकासासाठी तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना.

१९८४ : चार महत्त्वाच्या संस्थांकडून आंतरराष्ट्रीय स्वच्छता प्रशिक्षण कार्यक्रमाचे जाळे विकसित करण्यात आले.

१९८६ : १) राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाची स्थापन

२) राष्ट्रव्यापी केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची घोषण

१९९१ : १) राष्ट्रीय पेयजल मोहिमेस राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम असे नात्र देण्यात आले.

२) युनिसेफच्या वतीने बंगालमधील मेदिनीपूर येथे ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा लाभ ९ टक्के कुटुंबापर्यंत पोहचविण्यात आला.

१९९९ : १) भारत सरकारने ग्रामाण पाणीपुरवठा व स्वच्छता क्षेत्राची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला व केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमास संपूर्ण स्वच्छता अभियान असे नाव दिले.

२) संपूर्ण स्वच्छता अभियान मागणी आधारीत ठेवण्याचे निश्चित करून फक्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना अनुदान देण्याचा निर्णय देण्यात आला.

३) सन २०१२ पर्यंत संपूर्ण देश हागणदारीमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२००० : १) जगातील १४९ देशांनी सहस्त्रक विकास ध्येय ठरवून स्वच्छता कार्यक्रमास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला.

२) महाराष्ट्रामध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाला सुरूवात झाली.

२००१ : ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम २१ टक्के कुटुंबापर्यंत पोहचला.

२००२ : मेदिनीपूर जिल्ह्यातील नंदीग्राम २ हे भारतातील १०० टक्के स्वच्छ पंचायत समिती म्हणून घोषित करण्यात आले.

२००३ : १) तामिळनाडूमध्ये ग्रामस्वच्छता अभियानाला सुरूवात

२) निर्मल ग्रामपुरस्काराची घोषणा

२००५ : ३८ ग्रामपंचायती, दोन पंचायत समिती यांना १०० टक्के निर्मल घोषित करण्यात आले.

२००६ : १) ७० ग्रामपंचायतीपैकी ९ पंचायती समित्यांना निर्मल पुरस्कार देण्यात आले.

२) संपूर्ण स्वच्छता अभियानात घन व द्रव कचरा निर्मूलनाचा समावेश

२००७ : ४९४५ ग्रामपंचायती व १४ तालुका पंचायती समित्यांना निर्मल ग्राम पुरस्कार घोषित.[२१ब]

*संदर्भ- युनिसेफ २००५, राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल मिशन, भारत सरकार*

### १.२.१०. महाराष्ट्रातील संपूर्ण स्वच्छता अभियान

सर्व जिल्ह्यामध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान राबवणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये युनीसेफ व विविध स्वयंसेवी संस्था यांच्या समन्वयातून महाराष्ट्र पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे हे अभियान चालवलेले आहे. याशिवाय जागतिक बँकेच्या जलस्वराज्य प्रकल्पाची स्वच्छता अभियानासाठी मदत घेण्यात आली आहे. सन २००० ते २००१ या काळात हे अभियान रायगड, धुळे, अमरावती, नांदेड या चार जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात आला. या प्रकल्पासाठी ५६.५७ करोड खर्च आला. २००१ ते २००२ या काळामध्ये हे अभियान सांगली, औरंगाबाद, चंद्रपूर, रत्नागिरी आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आले. यासाठी ८३.९६ करोड खर्च आला. २००२ ते २००३ या काळामध्ये नंदुरबार, जालना, जळगाव, अहमदनगर या जिल्ह्यांचाही समावेश करण्यात आला. या जिल्ह्यांसाठी ६०.६७ करोड खर्च आला. २००३-२००४ या काळामध्ये पुणे, सातारा, कोल्हापूर, बीड, अकोला, नागपूर या जिल्ह्यातही अभियान

राबविले गेले. या जिल्ह्यासाठी ६०.९५ करोड खर्च लागला. २००५ साली महाराष्ट्रातील संपूर्ण ३३ जिल्ह्यामध्ये हे अभियान राबविले गेले.[२२]

**महाराष्ट्रातील संपूर्ण स्वच्छता अभियान अंमलबजावणीचे धोरण**

१) जिल्हा परिषदेच्या स्तरावर अंमलबजावणीचे विकेंद्रीकरण

२) या अभियानामध्ये विजेते झालेल्यांना निर्मल ग्रामसाठी तयार करण्यात आले.

३) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये विजेत्या गावांना आदर्श गावाचा नमुना म्हणून मानले गेले.

४) विजेत्या गावांना अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटीचा उपयोग इतर गावांच्या सुधारणेमध्ये आणि चांगल्या वर्तणुकीच्या बळकटीसाठी झाला.

५) आदर्श गावामध्ये जिल्ह्याचे अधिकारी, ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी, बचतगट, महिला मंडळ सहभागी असते.[२३]

### १.२.११. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

महाराष्ट्रातील संपूर्ण स्वच्छता अभियानाची सुरूवात रायगड, धुळे, अमरावती व नांदेड या चार जिल्ह्यातील पथदर्शी प्रकल्पासून झाली. (सन २०००-२००१) संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या दुसऱ्या टप्यात सांगली, औरंगाबाद, चंद्रपूर, यवतमाळ व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. परंतु संपूर्ण स्वच्छता अभियानास महाराष्ट्रभर गती आणि बळकटी मिळावी म्हणून सन २०००-२००१ पासूनच महाराष्ट्र शासनाने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरू केले. हे अभियान कालबध्द स्वरूपाचे असून स्वच्छता, आरोग्य हे लोकचळवळीचे विषय बनविणे व अभियानात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग मिळवणे हे या अभियान कार्यक्रमाचे उद्दीष्ट होते. हे उद्दीष्ट फार मोठ्या प्रमाणावर यशस्वी झालेले दिसून येते. या अभियानाने स्वच्छता क्षेत्रातील माहिती, शिक्षण आणि संवादाचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.

स्वच्छतेतून समृध्दीकडे हे ब्रीदवाक्य असलेले हे अभियान महाराष्ट्रभर दोन टप्प्यात राबवण्यात येते.

**टप्पा १ :** संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान (दरवर्षी २ ऑक्टोंबर ते ३१ ऑक्टोंबर) या टप्प्यातील नियोजन कार्यक्रमाचे वेळापत्रक खालील सारणी क्र -१ मध्ये दिलेले आहे. या वेळापत्रकाप्रमाणे संपूर्ण गाव अभियानाची अंमलबजावणी करते. या कामास शासकीय अधिकारी व स्वयंसेवी संस्था मार्गदर्शन करतात.

सारणी क्र. २.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान**

| | |
|---|---|
| २ ऑक्टोबर | अभियानाची ग्रामसभा |
| ३ ऑक्टोबर | ग्रामसफाई व कचरा मुक्ती दिवस |
| ५-६ ऑक्टोबर | शोषखड्डे स्वच्छता/बांधकाम दिवस |
| ७-८ ऑक्टोबर | शाळा स्वच्छता अभियान दिवस |
| ९-१० ऑक्टोबर | घर व परिसर स्वच्छता व सजावट दिवस |
| ११-१२ ऑक्टोबर | स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके दाखविणे |
| १३-१४ ऑक्टोबर | शौचालय दुरूस्ती, बांधकाम अभियान दिवस |
| १५-१६ ऑक्टोबर | पाणी शुध्दता, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दिवस |
| १७-१८ ऑक्टोबर | वैयक्तिक आरोग्यविषयक जागरूकता व स्वच्छता दिवस |
| १९-२० ऑक्टोबर | रस्ता दुरूस्ती व श्रमदान दिवस |
| २१-२२ ऑक्टोबर | जनावरे स्वच्छता मोहिम दिवस |
| २३-२४ ऑक्टोबर | वृक्ष संवर्धन, परसबाग उर्जासंरक्षण दिवस |
| २५-२६ ऑक्टोबर | गावात म्हशी, निबंध स्पर्धा व व्यसनमुक्ती दिवस |
| २७-२८ ऑक्टोबर | सदृढ बालक स्पर्धा दिवस, माता बाल संगोपन, रोगनिदान व साथीचे रोग प्रतिबंधक दिवस |
| २९-३० ऑक्टोबर | गटारे सांडपाणी निर्मूलन दिवस |
| ३१ ऑक्टोबर | संकल्प दिवस |

### १.२.१२. टप्पा क्र २. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता ग्राम स्पर्धा

(प्रतिवर्षी नोव्हेबर ते सप्टेंबर)

या टप्यात गावात झालेल्या स्वच्छता व आरोग्य विषयक कामांचे, लोकसहभागाचे तसेच वर्तनबदलाचे मूल्यमापन विविध स्तरावर त्या त्या पातळीवरील समित्यांद्वारे केले जाते. व उत्तम प्रगती दाखविणाऱ्या गावांना शासनातर्फे राज्यभरातील ग्रामपंचायतीच्या पातळीवर एकूण ११६१ बक्षिसे दिली जातात. तर बक्षिसांची एकूण रक्कम ६५३ लाख इतकी असते. या

मूल्यमापनासाठी विविध स्तरावर मूल्यमापन समित्यांची नेमणूक करण्यात येते. या समित्यांमध्ये शासकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार व तज्ञ व्यक्तींचा समावेश असतो. महाराष्ट्र शासनाने संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियानास मान्यताप्राप्त माहिती, शिक्षण व संवाद प्रतिरूप म्हणून स्वीकारले असून त्यावर दरवर्षी सुमारे १० कोटी रूपये खर्च केला जातो. जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनीं या अभियानात सहभागी व्हावे व त्यासाठी पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांनी विशेष प्रयत्न करावेत यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २००१-०२ पासून पंचायतसमिती व जिल्हा परिषद यांच्यासाठी रोख बक्षिसे देण्यास सुरूवात केली आहे. यामध्ये विभागीय स्तरावरील एक पंचायत समिती व एक जिल्हापरिषद निवडली जाते व त्यांना अनुक्रमे १.५ लाख व ३ लाखाचे बक्षिसे देण्यात येते. राज्यस्तरावर मात्र स्वच्छता अभियानात उल्लेखनीच कार्य करणाऱ्या तीन प्रथम पंचायत समित्यांना ७.५, ५.०, २.५ लाख रूपयांचे रोख बक्षिसे दिली जातात. संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तीन उत्कृष्ट जिल्हा परिषदांना अनुक्रमे १५.०, १०.०, ५.० लाखांची बक्षिसे दिली जातात.

**अभियानाची सुरूवात** : दरवर्षी २० ते २५ सप्टेंबर या काळात प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली अभियान समितीची बैठक घेऊन अभियानाची पूर्व तयारी केली जाते.

**अभियान समितीमध्ये पालकमंत्र्याच्या खेरीज खालील सभासदांचा समावेश असतो.**

१) जिल्ह्याचे पालक सचिव
२) जिल्हा परिषद अध्यक्ष
३) जिल्हाधिकारी
४) मुख्य कार्यकारी अधिकारी
५) आरोग्य, महिला व बालकल्याण, समाजकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि प्रसिध्दी विभागाचे अधिकारी
६) स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी
७) लोकप्रतिनिधी (आमदार)
८) स्वातंत्र्यसैनिक प्रतिनिधी
९) मेडीकल असोशिएशन प्रतिनिधी
१०) निवृत्त सैनिक संघटना प्रतिनिधी

### १.२.१३. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची वैशिष्ट्ये

१) अभुतपूर्व उत्साह व लोकांचा प्रचंड सहभाग

२) माहिती, शिक्षण व संवादाच्या सर्व माध्यमांचा वापर

३) लोकांच्या अभिनव कल्पनांना पुरेपूर वाव

४) समाजाच्या सर्व स्तरातील व्यक्तींचा सहभाग

५) सामूहिक निर्णयप्रक्रिया

६) निश्चित वेळापत्रकामुळे कार्यक्रमांना बांधीव नीटनेटकेपणा

७) स्वच्छतेच्या शासकीय कार्यक्रमाचे लोकांच्या चळवळीमध्ये रूपांतर

८) स्पर्धात्मकतेमुळे अभियानास गती

या अभियानाच्या काळात महाराष्ट्रातील खेड्यांनी स्वखर्चातून कोट्यावधी रूपयांची सामाजिक कामे पार पाडली. लोक संवादातून लोकचळवळ साकारते व सामाजिक वर्तनबदल घडतो हे या अभियानातून सिध्द झाले.[२४]

### १.२.१४. सांगली जिल्ह्यातील संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी

सांगली जिल्ह्यामध्ये संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी निरनिराळ्या नवीन तंत्रज्ञान व कौशल्य यांच्या आधारे करण्यात आली. हा कार्यक्रम पूर्णपणे लोकांच्या सहभागाचा होता. माहिती, शिक्षण व संवाद या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यामध्ये वेगवेगळे कलाकार स्त्रियांचे गट, लोकसमूह, बचतगट, स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग होता. सांगली जिल्ह्यात या अभियानाने प्रभावी अशा लोकचळवळीचे रूप धारण केलेले दिसते. अगदी सुरूवातीपासूनच संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान स्पर्धेमध्ये सांगली जिल्ह्यातील तुंग, यमाजी पाटलाची वाडी, अंकलखोप, कवठेपिरान या गावांनी विभागीय व राज्यपातळीवर पारितोषिके पटकाविली. सांगली जिल्ह्यातील माळवाडी या गावाने शंभर टक्के शौचालये बांधून पहिल्या हागणदारी मुक्त गावाचा मान मिळविला. यशस्वी गावांनी इतर गावांच्यामध्ये माहिती, शिक्षण व संवादाचे कार्य यशस्वी होण्यासाठी मदत केली. परिणामी सांगली जिल्ह्यातील माहिती, शिक्षण, संवाद कार्यक्रम देशपातळीवर वाखाणला गेला व त्यातील अनेक घटकांचे अनुकरण

देशभरातील अनेक राज्यांनी केले. मानवेंद्रनाथ रॉय अनौपचारिक शिक्षण व संशोधन संस्थेने गवंडी प्रशिक्षण, निर्धूर चूल प्रशिक्षण व ग्रामीण घनकचरा निर्मुलन तंत्रज्ञान, महिला प्रशिक्षण व अधिकारी प्रशिक्षण या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. यासाठी या संस्थेचा तत्कालीन ग्रामविकास मंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

**या अभियानाची वैशिष्ट्ये**

१) या अभियानामध्ये महिला, युवक आणि लहान मुले यांच्यावर भर देण्यात आला.

२) स्वच्छता अभियानाला लोकचळवळ बनवण्य सां ासाठी वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले.

३) कलापथक, रॅली आणि गटचर्चा यासारखे सांस्कृतिक व भावनिक कार्यक्रम घेण्यात आले.

४) स्वच्छता असणे हे चांगला दर्जा असण्याचे चिन्ह बनविण्यात आले.

५) संपूर्ण स्वच्छता अभियान राबविण्यामध्ये स्त्रियांच्यामधील नेतृत्व गुण आणि ग्रामीण युवकांचे नेतृत्व यांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

६) निर्णय घेण्याच्या क्षमतेचे विकेंद्रीकरण समूहाच्या पातळीवर घेण्यात आले.

सांगली जिल्ह्यामध्ये भारत सरकारने २००१–२००२ या काळात संपूर्ण स्वच्छता अभियानाला मान्यता दिली. एकूण खर्च ९७८.४५ लाख करण्यात आला.[२५]

# III

# माहिती, शिक्षण आणि संवाद

माहिती, शिक्षण आणि संवाद ही संकल्पना १९७० च्या दशकात संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संघटनेने प्रथम वापरल्याचे दिसून येते.[२६] लोकशिक्षणाशिवाय सार्वजनिक आरोग्याचा कोणताही कार्यक्रम यशस्वी होवू शकत नाही. कारण लोक चांगल्या सेवासुध्दा मनाला पटल्याशिवाय आणि त्यांना गरजेच्या वाटल्याशिवाय स्विकारत नाहीत. परंपरागत सामाजिक, सांस्कृतिक समज, अस्वच्छतेच्या जुन्या सवयी ज्या नेहमीच नव्या स्वच्छता व आरोग्यविषयक संकल्पना स्विकारण्यामधील अडसर बनतात म्हणून स्वच्छता व आरोग्य शिक्षण ही गोष्ट नव्या आरोग्यविषयक सवयी शिकवण्यामध्ये सर्वात महत्त्वपूर्ण ठरते. या शिक्षणामध्ये ज्ञान, दृष्टीकोन व वहिवाट किंवा अनुसरण या तीन महत्त्वाच्या पायऱ्या आढळून येतात. **ज्ञान** म्हणजे शास्त्रीय संशोधनावर आधारीत सोप्या आरोग्य संदेशांची माहिती. ही माहिती लोकांच्या भाषेत थोडक्यात व स्पष्ट स्वरूपात निर्माण करणे व लोकांपर्यंत पोहोचवणे. **दृष्टीकोन परिवर्तन** म्हणजे लोकांना आपल्या गैरसमजावर मात करून नव्या शास्त्रीय गोष्टी स्विकारण्यास मदत करणे. **अनुसरण** म्हणजे लोकांच्यामध्ये योग्य तो वर्तनबदल घडून येणे. या सर्व गोष्टींसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर जी पध्दती स्विकारण्यात आली आहे तिला माहिती, शिक्षण व संवाद (Information Education and Communication) (IEC) असे म्हटले जाते.

सरकारी पत्रके व जाहिराती यांच्यामुळे लोकांच्या मानसिकतेमध्ये फारसा बदल दिसून येत नाही व लोक नवी तंत्रज्ञाने व संशोधने स्विकारण्यास सहजासहजी तयार होत नाहीत असे दिसून आल्यावर लोकसंवादाकडे अधिक गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. असा निष्कर्ष काढून तंत्रांनी प्रचाराऐवजी माहिती, शिक्षण व संवाद ही नवी संज्ञा सामाजिक विकास क्षेत्रात रूढ केली.

माहिती, शिक्षण आणि संवाद ही संकल्पना १९७० च्या दशकात संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संघटनेने सर्वप्रथम वापरल्याचे दिसून येते.

अमेरिकेतील प्रतिबंधात्मक औषधी शास्त्राच्या राष्ट्रीय परिषदेने माहिती, शिक्षण व संवादाची एक व्याख्या केलेली आहे. त्यानुसार लोकांना आरोग्यपूर्ण सवयी आणि जीवनपध्दती स्विकारून पर्यावरणीय बदलांच्या गरजानुसार वागण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या माहिती देऊन प्रबोधित करणाऱ्या त्याचवेळेस व्यावसायिक प्रशिक्षण व संशोधन करण्याच्या प्रक्रियेस माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रिया असे म्हणतात. थोडक्यात (IEC) चा उद्देश हा लोकांच्या आरोग्यविषयक सवयीमध्ये योग्य तो बदल घडवून आणणे हा आहे.[२७]

**१.३.१. संकल्पना व अर्थ**

माहिती, शिक्षण व संवाद या तीन शब्दांना स्वत:चे असे अर्थ आहेत. माहिती ही संवादापेक्षा वेगळी गोष्ट असते. प्रत्येक संप्रेक्षणामध्ये माहिती असते परंतु प्रत्येक माहिती संवादाचा विषय बनू शकत नाही. संवादकाला प्रथम ज्या गोष्टींविषयी लोकांशी संवाद साधावयाचा असतो, त्यासंदर्भातील शास्त्रीय माहिती गोळा करतो आणि योग्य संवाद पध्दतीचा वापर करून योग्य तो वर्तनबदल घडवून आणू इच्छितो.

शिक्षण व प्रशिक्षण या शब्दांचा स्वच्छता व आरोग्य संदर्भातील अर्थ म्हणजे व्यवसायासंबंधीत कौशल्य मिळविणे असा नसून सेवेविषयी भावनिक बांधीलकी निर्माण करणे असे आहे. येथे शिक्षण म्हणजे मनाच्या व मेंदूच्या विशेष क्षमता योग्य त्या मार्गदर्शनाखाली विकसित करणे होय. स्वच्छता, आरोग्य, नागरी कर्तव्ये, पर्यावरण संरक्षण इत्यादी गोष्टींना संपूर्ण स्वच्छता अभियानातील शिक्षण व प्रशिक्षण प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असते. या प्रशिक्षणाचा उद्देश स्वच्छता व आरोग्य कार्यासाठी झोकून देवून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गट विकसित करणे हा असतो.[२८]

कम्युनिकेशन (संवाद) हा शब्द लॅटिनमधील कम्युनिस Communis या शब्दापासून विकसित झालेला आहे. प्रत्यक्ष वापरामध्ये वास्तव गोष्टी, संकल्पना आणि मतांच्या विनिमयाच्या प्रक्रियेस संवाद असे म्हणतात किंवा ऐकणाऱ्याच्यामध्ये महत्त्वपूर्ण वर्तन बदल घडवून आणण्यासाठी संवादकाने केलेल्या मौखिक किंवा अन्य विचार विनिमयास संवाद असे म्हणतात.[२९]

### १.३.२. संपूर्ण स्वच्छता अभियानातील माहिती, शिक्षण व संवादाचे स्वरूप

भारतातील जातीव्यवस्था, निरक्षरता व भयानक दारिद्र्य यामुळे ग्रामीण भागातील बहुसंख्य समाज हा आपला आत्मसन्मान हरवून बसलेला आहे. महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे विद्येच्या अभावी ग्रामीण समाजाची मती, गती, निती व वित्त गेलेले आहे आणि त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे जेव्हा माणसास दारिद्र्य येते तेव्हा त्याचे अर्धे सद्गुण त्याला सोडून जातात. भारतातील बहुसंख्य जनता खेड्यात राहते. शेती, कारागिरी आणि शेतमजुरी यावर त्यांची उपजीविका चालते. बहुसंख्यांकांचे राहणीमान त्यामुळेच निकृष्ट दर्जाचे आहे. अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या मुलभूत गरजा भागविण्याच्या धकाधकीत त्यांचे सांस्कृतिक उन्नयन हव्या त्या प्रमाणात न झाल्याने आधुनिक समाजातील सार्वजनिक स्वच्छता, वैयक्तिक आरोग्य, परिसर स्वच्छता आणि रोगराई याबाबतीत आधुनिक दृष्टिकोन व शास्त्रीय माहिती लोकांच्यापर्यंत पोहोचलेली नाही. अपवाद वगळता इतिहासात सार्वजनिक स्वच्छता, शौचालये यांना कसलेच स्थान नसल्याने ग्रामीण भागामध्ये शौचालयाची बांधणी, त्याचा उपयोग, फायदे व त्याचा आरोग्याशी असलेला संबंध याबाबत प्रचंड अज्ञान आहे. गेल्या शतकात इंग्रजी आमदानीच्या सान्निध्यामुळे भारतातील शहाण्यासुरत्या मंडळींना आधुनिक विज्ञान व वैद्यकशास्त्र यांची ओळख झाली तसेच स्वच्छता आणि आरोग्य यांचा सहसंबंध, जंतू आणि त्यांचा प्रसार, उघड्यावरील मलविसर्जन आणि साथीचे रोग यांच्यातील सहसंबंध लक्षात येऊ लागला. त्यामुळे प्रथम महात्मा फुले व त्यानंतर महात्मा गांधी, डॉ. पटवर्धन, संत तुकडोजी इत्यादी समाजसुधारकांनी आपल्या कार्यात सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेस महत्त्व दिले. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा असूड आणि स्वच्छताविषयक अखंडामधून स्वच्छतेचे महत्त्व व सार्वजनिक आरोग्य याविषयी विवेचन केले आहे. महात्मा गांधी यांनी तर शौचालयाच्या बाबतीत सामाजिक मोहीमच सुरू केली आणि टट्टी पे मिट्टी अशी घोषणा केली. संत तुकडोजी महाराजांनी आणि संत गाडगे महाराजांनी लोकांच्या मनाच्या स्वच्छतेबरोबरच शरीराची स्वच्छता आणि परिसराची स्वच्छता या संदर्भातील जनजागृतीस आपले जीवीत ध्येय मानले होते. संत तुकडोजी महाराजांचा ग्रामगीता हा ग्रंथ स्वच्छता व

ग्रामीण विकास या विषयावरील ज्ञानकोषच आहे. वरील सर्व समाजसुधारकांनी केलेले कार्य म्हणजे स्वच्छताविषयक माहिती, शिक्षण व संवादाचा आदर्श वस्तुपाठ आहे.

१९८६ साली सुरू झालेल्या केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत अनुदान देवून बऱ्याचशा शौचालयांची निर्मिती करण्यात आली. परंतु नंतरच्या सर्वेक्षणात असे आढळून आले की माहिती, शिक्षण व संवादाअभावी जवळजवळ ७० टक्के शौचालये एकतर वापरली जात नाहीत किंवा त्यांचा वापर शौचालय म्हणून न होता धान्याची कोठी, न्हाणीघर, सरपण ठेवण्याची जागा, शेळीचा गोठा, शेण्या ठेवण्याची जागा अशा कामांसाठी करण्यात येतो. अनेक ठिकाणी सांस्कृतिक पूर्वग्रहामुळे लोक शौचालयात जात नाहीत तर काही ठिकाणी विष्ठेच्या होणाऱ्या विल्हेवाटीबद्दल शास्त्रीय ज्ञान नसल्यामुळे घराजवळच्या शौचालयात जाणे त्यांना गैर वाटते. अनेक स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या व सरकारी यंत्रणेने केलेल्या पाहणीतून असे सिद्ध झाले की, शौचालयाची उपलब्धता असण्यापेक्षा शौचालयाच्या वापराची मानसिकता निर्माण करणे हे महत्त्वाचे आहे आणि हे काम केवळ सरकारी फतवे, घोषणा किंवा पत्रकांच्या सहाय्याने होत नाही. किंबहुना अनुदानाने हे साध्य होत नाही. म्हणून १९९९ साली सुरू करण्यात आलेल्या संपूर्ण स्वच्छता अभियानात माहिती, शिक्षण व संवाद प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. माहिती, शिक्षण व संवादाचे संपूर्ण स्वच्छता अभियानातील स्वरूप हे आरोग्य किंवा ग्रामीण विकास क्षेत्रातील स्वरूपापेक्षा वेगळे आहे. यातील घटकांचा वेगवेगळा विचार करता खालील गोष्टी प्रामुख्याने नमूद करता येतात.

**माहिती :** संपूर्ण स्वच्छता अभियानात सहभागी असणाऱ्यांना अभियान यशस्वी राबविण्यासाठी विविध प्रकारच्या माहितीची गरज असते. प्रत्येक पातळीवरील संवादासाठी माहितीची गरज असते. परंतु सर्व माहिती संवादासाठीच उपयोगात येईल असे नाही. अभियानात नियोजनकर्ते, अंमलबजावणी करणारी यंत्रणा व अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, पत्रकार, संवाद साधणारे लोककलाकार आणि लाभार्थी यांना वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीची गरज असते. अभियानाचे नियोजनात्मक स्वरूप, उद्दिष्टे, आर्थिक तरतूदी, सरकारने वेळोवेळी काढलेले आदेश, प्रगतीचे

टप्पे, देखरेख व मूल्यमापन पद्धती, लेखापरीक्षण पद्धती या स्वरूपाची माहिती नियोजनकर्ते, जिल्हापरिषद व स्थानिक पातळीवरील अधिकारी यांना गरजेची असते. शौचालय, शोषखड्डे, गांडुळखत प्रकल्प नेडप कंपोस्ट, गटारी, बायोगॅस यांच्या बांधकामाचे तंत्रज्ञान व त्याचे विविध पर्याय या संदर्भातील माहिती शासकीय अभियंते, गावपातळीवरी गवंडी, स्वयंसेवी संस्थांकडील तांत्रिक सल्लागार इत्यादींना उपयोगी पडते. अस्वच्छतेतून निर्माण होणारे आजार, उघड्यावर शौचाला गेल्याने पसरणारे साथीचे रोग, किटकांमुळे पसरणारे रोग, त्यांना कारणीभूत असणारे जंतू, प्रतिबंधक उपाय व उपचार या संदर्भातील माहिती आरोग्य खात्याचे कर्मचारी, अंगणवाडी शिक्षिका, स्वयंसेवी संस्थांतील आरोग्य तज्ञ आणि संवादक यांचेकडे असणे उपयोगी ठरते. वैयक्तिक स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य या संदर्भातील म्हणी, वाक्प्रचार, गाणी, गोष्टी, पथनाट्ये, अभंग, भारूडे अशा गोष्टींची माहिती संवादक, वक्ते, कलाकार, नाटकमंडळी यांना मिळवावी लागते. संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या विविध पैलूंच्या संदर्भातील सखोल माहितीची एक माहिती पेढी जिल्हा पातळीवर निर्माण करणे हे अभियानाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अट आहे.

**शिक्षण :** संपूर्ण स्वच्छता अभियानात शिक्षण व प्रशिक्षणास फार मोठे महत्त्व आहे. मनुष्य शिक्षणाने बनतो. शिक्षण व प्रशिक्षण वर्तनबद्दल घडवण्यामागे मोठी भूमिका पार पाडू शकते. केवळ ऐकीव माहितीवर लोक आपले पूर्वग्रह सोडून नव्या शास्त्रीय पद्धतीचा स्विकार करत नाहीत. या संदर्भात एका चिनी म्हणीचा प्रत्यय येतो.[३०]

*'मैने सूना, भूल गया,*

*मैने देखा, याद रहा.*

*मैने करके देखा समझ गया'*

म्हणूनच अभियानांच्या यशस्वीतेसाठी विविध पातळ्यावर प्रशिक्षणाची गरज भासते. या प्रशिक्षणाच्या चार पातळ्या कल्पिता येतात.[३१]

१) अधिकारी प्रशिक्षण　　　　२) तांत्रिक प्रशिक्षण

३) आरोग्य प्रशिक्षण ४) संवाद प्रशिक्षण

**१) अधिकारी प्रशिक्षण :** जिल्ह्याच्या पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी व विविध खात्यांचे प्रमुख स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांची मिळून जिल्हा अभियान समिती स्थापन केली जाते. या समितीचे प्रमुख जिल्हापरिषदेचे अध्यक्ष असतात. याशिवाय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एका कार्यान्वय समितीची स्थापना केलेली असते. दुसऱ्या पातळीवर तालुका स्वच्छता समित्या स्थापन केल्या जातात व शेवटी ग्रामस्वच्छता कमिटी निर्माण होते. ग्रामस्वच्छता कमिटीलाच वॉटसन कमिटी किंवा ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती असे संबोधले जाते. याशिवाय शालेय स्वच्छता कार्यक्रमासाठी वेगळ्या समितीची स्थापना केली जाते. या विविध समित्यामध्ये काम करणाऱ्या अधिकारी वर्गासाठी अभियानाचे स्वरूप, व्यवस्थापन, आर्थिक तरतूदी, देखरेख व मूल्यमापन याबाबतीत प्रशिक्षण आवश्यक असते. याशिवाय लोकसहभाग व संवाद प्रक्रियेचे प्रशिक्षणही या समित्यातील सदस्यांना देणे फायद्याचे ठरते.

लोकप्रतिनिधी, शिक्षक, तरूण मंडळे यांनाही अभियानाचे महत्त्व, स्वरूप, टप्पे व कार्यान्वयन पद्धती याबाबत प्रशिक्षण देणे फायद्याचे ठरते. सदरचे प्रशिक्षण कार्यक्रम हे राज्यस्तरीय साधनव्यक्ती, समाजशास्त्रज्ञ, संवादतज्ञ, तंत्रज्ञ यांच्या मदतीने जिल्हा व तालुका पातळीवर आयोजित केले जातात. याप्रकारच्या प्रशिक्षणासाठी जिल्ह्याच्या संपूर्ण स्वच्छता अभियान प्रकल्पामध्ये आर्थिक तरतूद करण्यात आलेली असते.

**२) तांत्रिक प्रशिक्षण :** संपूर्ण स्वच्छता अभियानामध्ये उपयोजित व पर्यायी तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिका आहे. भारतीय ग्रामीण समाजात शौचालये, शोषखड्डे, गांडूळखत प्रकल्प, नेडॅप कंपोस्ट इत्यादी अनेक गोष्टी अपरिचीत असल्याने लोक या गोष्टींच्या तंत्रज्ञानाबाबत अनभिज्ञ आणि म्हणूनच साशंक असतात. म्हणून संवाद तंत्रज्ञानाइतकाच तंत्रज्ञानसंवाद महत्त्वाचा आहे. तंत्र स्विकारण्यासाठी तंत्रज्ञान साक्षरता ही महत्त्वाची पूर्व अट असते. तांत्रिक प्रशिक्षण हे अभियंते, गवंडी, ग्रामपातळीवरील अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासाठी आयोजीत करणे महत्त्वाचे असते. केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाच्या

अयशस्वीतेमागे सुयोग्य तंत्रज्ञानाबाबतचे अज्ञान हे एक प्रमुख कारण अभ्यासकांना आढळले आहे. तांत्रिक प्रशिक्षणामध्ये बांधकाम प्रात्यक्षिकांचा मोठा उपयोग होतो. गावपातळीवर स्थानिक गंवड्याच्या सहाय्याने शौचालय बांधणीची व गांडूळखत प्रकल्पाची प्रात्यक्षिके फारच परिणामकारक ठरलेली आहे.

**३) आरोग्य प्रशिक्षण :** ग्रामीण भागातील लोकांना अस्वच्छ घर व परिसराची एवढी सवय पडलेली असते की ही वैयक्तिक अस्वच्छता गावातील बहुसंख्य रोगांना कारणीभूत असून त्यामुळेच आपल्या जीवित व वित्तास मोठी हानी पोहोचते. हे त्यांच्या ध्यानीमनी नसते. म्हणूनच आरोग्य प्रशिक्षणाची गरज गावपातळीवर मोठ्या प्रमाणात आहे. इतकेच काय तर डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी देखील रोगांच्या उपचारावर समाधान मानतात. पण वैयक्तिक स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याचा अवलंब करून रोगांचे मूळच नष्ट करता येईल. हे त्यांना शिकवणे गरजेचे आहे, म्हणून संपूर्ण स्वच्छता अभियानात आरोग्य अधिकारी शिक्षक, प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्त्या, विद्यार्थी आणि महिला बचतगट यांच्यासाठी आरोग्य प्रशिक्षणाचे आयोजन करावे लागते.

**४) संवाद प्रशिक्षण :** संवाद ही एक कला आहे. तसेच ते एक शास्त्रही आहे. म्हणूनच वर्तन परिवर्तन घडवण्याच्या हेतूने करावयाच्या संवादाचे शास्त्रीय प्रशिक्षण अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक लोकलाकार यांना द्यावे लागते. यासाठी विविध पातळीवर कार्यशाळा व शिबीरे आयोजित करता येतात. ग्रामीण पत्रकार व स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी यांनादेखील संवाद प्रशिक्षणाचा मोठा फायदा होतो.

**संवाद :** संपूर्ण स्वच्छता अभियानात संवादाला अतिशय महत्त्व देण्यात आले आहे. संवादाद्वारे लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणतात. रूढी, परंपरा, सांस्कृतिक समज, पिढ्यानपिढ्यांच्या सवयी यामध्ये हळूवारपणे योग्य तो बदल घडवून आणून लोकांना नव्या शास्त्रीय स्वच्छता व आरोग्य संकल्पना शिकविता येतात. संवादाचे अनेक प्रकार आहेत. उदा.

१) व्यक्तीव्यक्तीमधील संवाद (Interpersonal Communication)

२) गटचर्चा (Group Discussion)

३) व्याख्याने (Public Lectures)

४) प्रात्यक्षिके (Demonstrations)

५) दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने संवाद (Communication through Audio-Visual aids) स्लाईड शो, फिल्म, व्हिडीओ, फ्लिपचार्ट, भित्तीपत्रके इ.


६) लोककला माध्यम (folk-Medial) - पोवाडे, कलापाथक, गाणी, पथनाट्य, लोकनाट्य, कळसुत्री बाहुल्या, भारूड, कीर्तन, भजन इत्यादी

७) प्रसार माध्यमे (Mass Media) : वर्तमान पत्रे, रेडिओ, टीव्ही, केबल टीव्ही, इंटरनेट इ.

**संपूर्ण स्वच्छता अभियानातील संवादामध्ये ४ महत्त्वाचे घटक असतात.**

**१) संवादक २) संदेश ३) जनता (लाभार्थी) ४) फीडबॅक**

**आकृती**




*आधार - डॉ. व्ही. एम. पटेल माहिती, शिक्षण, संवाद कन्सल्टंट इन्व्हॉर्नमेंट सॅनीटेशन इन्स्टिट्यूट गांधी आश्रम, अहमदाबाद* [३४]

प्रत्यक्षात संवाद पहिल्या तीन घटकांच्याद्वारे होत असला तरी ग्रहनकर्त्याच्या प्रतिक्रियेशिवाय संवाद खऱ्या अर्थाने परिणामकारक व द्विमुखी होत नाही. घरभेटी, दोन व्यक्तीमधील चर्चा, सल्ला ही व्यक्ती-व्यक्तीमधील संवादाची उदाहरणे आहेत. ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, प्रतिष्ठीत व्यक्ती, शिक्षक याप्रकारच्या संवादाद्वारे महत्त्वपूर्ण भूमिका

बजावत असतात. ही प्रतिक्रिया द्विमुखी असल्याने संवादग्रहण कर्त्याला आपल्या शंका विचारून समाधान करून घेता येते. ही एक अतिशय परिणामकारक संवादपध्दती आहे.

व्यक्ती-व्यक्तीमधील संवादाचा एक दुसरा प्रकार म्हणजे गटचर्चा किंवा वर्गचर्चा यामध्ये फळा, फ्लीपचार्ट, पॉकेट अल्बम, चित्रे इत्यादींचा वापर करून तांत्रिक किंवा शास्त्रीय संदेश नीटपणे ग्रहणकर्त्यापर्यंत पोह्चवता येतात. याचा उपयोग स्वच्छता अभियानातील तांत्रिक गोष्टी उदा. स्वच्छता व रोगप्रसार, शौचालय बांधकामाचे नवीन नमूने, शोषखड्ड्यांची रचना व कार्य, गांडुळखत प्रकल्पाची उभारणी इत्यादी गोष्टी नीटपणे समजावून सांगता येतात.

लोकांच्या मोठ्या गटांना संबोधीत करताना व्याख्यानांचा चांगला उपयोग होतो. व्याख्याने टीव्ही, रेडीओ यांच्यामुळे लोकांना भावनिकदृष्ट्या अभियानाशी जोडता येते. प्रसारमाध्यमांचा उपयोग करून लोकांची जाणीव जागृती वाढवता येते. परंतु ही माध्यमे विशेष करून माहितीप्रमाण आहेत. त्यामुळे या माध्यमातून फारसा वर्तनबदल घडत नाही. लोकांना भावनिकदृष्ट्या संवेदनशील बनवून सामूहिकदृष्ट्या कृतीशील बनविण्यासाठी लोककला व लोककलाकारांचा अत्यंत चांगला उपयोग करून घेता येतो. कीर्तने, सोंगी भजने व भारूडे यांमध्ये आरोग्यविषयक संदेशांना गुंफून लोकांना भावनिक आवाहन केले जाते.

पथनाट्ये, पोवाडे, गाणी, कलापथके ही माध्यमे देखील गटांना कार्यप्रवृत्त करण्यासाठी आणि कार्यक्रमाला चळवळीचे स्वरूप देण्यासाठी तसेच लोकांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपयोगी पडतात. संपूर्ण स्वच्छता अभियानामध्ये टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्राने देखील अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे. अभियानात केलेल्या चांगल्या कामाचे अहवाल लेख, यशस्वी गावातील लोकांच्या मुलाखती यामुळे अनेक नवीन गावांना संपूर्ण स्वच्छता अभियानात सहभागी होण्याची स्फूर्ती मिळाली आहे. संवादाच्या अनेक पध्दती उपलब्ध असल्या तरी उत्स्फूर्तपणे व झोकून देवून काम करणारे संवादक, विविध माध्यमांचा योग्यवेळेस व योग्य प्रमाणात उपयोग करून घेणारे अधिकारी व लोकप्रतिनिधी आणि लोकांच्याबरोबर राहून माहिती, शिक्षण व संवादाबरोबर प्रत्यक्ष बांधकामे, प्रशिक्षण व

देखरेख यात सहभागी होणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या समन्वयातून यशस्वी स्वच्छता अभियान आकार घेते.

### १.३.३. संपूर्ण स्वच्छता अभियान व स्वयंसेवी संस्था

१९८० सालानंतर जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेत स्वयंसेवी संस्था किंवा अशासकीय संस्था यांना महत्त्व आलेले दिसते. संयुक्त राष्ट्र संघ आणि संलग्न संस्था तसेच जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांनी अविकसित व विकसनशील देशांना विविध विकास कार्यक्रमांसाठी निधी पुरविण्यापूर्वी लोकजागृतीसाठी व लोकसहभाग वाढविण्यासाठी शासनाने स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी असे सूचित केले. अर्थातच प्राथमिक शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता कार्यक्रमातदेखील स्वयंसेवी संस्थांचा सहभाग अपरिहार्य बनला व समाजाच्या विकासामध्ये केवळ शासनाच्या सहभागापेक्षा शासनसंस्था व स्वयंसेवी संस्था यांच्या सहभागाचा संयुक्त दृष्टीकोन स्विकारण्यात आला.

**स्वयंसेवी संस्थांची गरज**


सरकार किंवा शासन विकास कार्यक्रमांची संपूर्ण जबाबदारी पार पाडू शकत नाही. तसेच सरकारी अधिकाऱ्यांमध्ये असलेल्या विविध कार्यालयीन व इतर कामांमुळे ते स्वच्छता अभियानासारख्या कार्यक्रमास ते पूर्ण वेळ देवू शकत नाहीत.

याशिवाय ग्रामीण जनता सहकारी अधिकाऱ्यांच्याकडे नेहमीच संशयाने पाहते आणि अधिकाऱ्यांचा लोकांशी पुरेसा व विश्वासार्ह संपर्क नसतो त्यामुळे एकटे सरकार संपूर्ण स्वच्छता अभियानासारख्या महत्त्वाकांक्षी आव्हानास तोंड देवू शकत नाही. सरकारी कामकाजात आज्ञापालन व एकसूरीपणा हे दोष असल्याने तेथे अभिनव कल्पना जन्म घेणे अवघड असते. याउलट स्वयंसेवी संस्थांच्याकडे अनेक प्रशिक्षित बुध्दीमान कार्यकर्ते, निःस्पृह व त्यागी समाजसेवक, व्यावसायिक समाजकार्य विशेषतज्ञ यांची फौज असते. याशिवाय या संस्था लोकांच्यामधून जन्म घेत असल्याने त्यांना लोकांच्या प्रश्नांची सखोल जाणीव असते. सरकारी यंत्रणेला बांधील नसल्याने त्यांना कल्पनांचे, नियोजनांचे व अंमलबजावणीचे भरपूर स्वातंत्र्य मिळते. परिणामी स्वयंसेवी संस्था योग्य तो बदल घडवून आणून अभियान यशस्वी करू शकतात.

स्वयंसेवी संस्थांचे विस्तृत जाळे पसरू शकल्याने या संस्था बहुसंख्य जनतेपर्यंत आरोग्याचे, विज्ञानाचे, विकासाचे व स्वच्छतेचे संदेश पोहोचवू शकतात. केरळ शास्त्र साहित्य परिषद, भारत ज्ञान-विज्ञान समिती आणि भारत जनविज्ञान जत्था या राष्ट्रव्यापी स्वयंसेवी संस्थांच्यामध्ये डॉ. एम. पी. परमेश्वरन, प्रोफेसर यशपाल, डॉ. अनिल सदगोपाल यासारख्या आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांनी सहभागी होवून साक्षरता, प्राथमिक शिक्षण, विज्ञान प्रसार व सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात अत्यंत मोलाचे काम केलेले आहे. या संस्थांनी देशातील जवळजवळ १० कोटी लोकांच्यापर्यंत शिक्षण, विज्ञान व आरोग्य यांचे संदेश पोहोचवले.

महाराष्ट्रामध्ये मानवेंद्रनाथ रॉय अनौपचारीक शिक्षण व संशोधन संस्था, जानकीदेवी बजाज ट्रस्ट व ग्रामोपयोगी विज्ञानकेंद्र, वर्धा इत्यादी स्वयंसेवी संस्थांनी संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या क्षेत्रात स्पृहनीय कार्य केलेले आहे.

**वर्तन बदलासाठी संवाद प्रक्रिया (आधार-युनिसेफ)**[३२]



**स्वयंसेवी संस्थांची भूमिका**

१) स्वयंसेवी संस्था शासकीय विकास कार्यक्रमांना लोकांच्या गरजानुरूप बदलण्यासाठी मदत करतात आणि त्याचवेळेस लोकांच्या खऱ्या गरजा शासनापर्यंत पोहोचवतात.

२) स्वयंसेवी संस्था शासन व लोक यामधील दुवा व संदेशवाहक म्हणून काम करतात.

३) स्वयंसेवी संस्थांची लोकांच्या विकासाशी अधिक बांधिलकी असते. तसेच त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये परिस्थितीनुरूप आवश्यक ती लवचिकता असते.

४) स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते लोकांच्यामध्ये राहून काम करतात आणि त्यामुळे त्यांना लोकांचे नेमके प्रश्न समजावून घेणे शक्य होते.

५) लोकांचा स्वयंसेवी संस्थांच्यावर शासकीय अधिकाऱ्यापेक्षा जास्त विश्वास असल्याने या संस्था लोकांना जबाबदारीची जाणीव करून देवून लोकांचा सहभाग वाढवितात.

६) स्वयंसेवी संस्थांच्याकडे लोककला व दृकश्राव्य साधने वापरण्याचे विशेष कौशल्य असते. त्यामुळे त्या कार्यक्रमाला अधिक लोकप्रिय बनवू शकतात आणि लोक ज्या कार्यक्रमात अधिक सहभागी होतात त्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेची शक्यता वाढते.

शासकीय यंत्रणेकडे भरपूर संसाधने असले तरी नियम व कायद्यांची किचकट यंत्रणा, निर्णय प्रक्रिया अवघड बनविते. म्हणून शासकीय निर्णय वेळेवर होत नाहीत. याउलट स्वयंसेवी संस्था निर्णयाच्या बाबतीत काम करण्याच्या क्षेत्राच्या बाबतीत व पध्दतीच्या बाबतीत अधिक लवचिक असतात म्हणून लोकजागृती, प्रबोधन, अंमलबजावणी, देखरेख व मूल्यमापन या सर्व सर्वच बाबतीत स्वयंसेवी संस्था शासनापेक्षा अधिक वेगवान व सरस ठरतात.[५]

### १.३.४. सांगली जिल्ह्यातील माहिती, शिक्षण व संवादाचा कार्यक्रम

संपूर्ण स्वच्छता अभियानाचे वैशिष्ट्य असणाऱ्या माहिती, शिक्षण व संवादाचे सांगली जिल्ह्यातील कार्य अत्यंत स्पृहनीय आहे. या कामातील अनेक अभिनव कल्पनांची राष्ट्रीय स्तरावर प्रशंसा करण्यात आली असून अनेक जिल्हे तसेच इतर राज्यातूनही सांगली जिल्ह्याच्या लोक संवाद कार्यक्रमातील उपक्रमांचे पुढील काळात अनुकरण झाल्याचे दिसते.



15561

जिल्ह्यातील आठवडी बाजारांच्या ठिकाणी जाऊन लोककला, पथनाट्य व तंत्रज्ञान प्रात्यक्षिके दाखविणारा एम. एन. रॉय संस्थेच्या लोकशिक्षण जत्था, स्वच्छता रथयात्रा, महिला गवंडी प्रशिक्षण, गांडुळखत निर्मिती प्रशिक्षण यासारख्या अनेक अभिनव उपक्रमामुळे सांगली जिल्ह्याचा माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम अद्वितीय ठरला आहे. जिल्ह्याच्या या कार्यक्रमातंर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले आहेत.

१) स्वच्छता ज्योत

२) स्वच्छता रथयात्रा

३) घरभेटी

४) लोकशिक्षण जथ्था

५) ऑडीओ, कॅसेट्स

६) चित्रपट प्रदर्शन

७) बॅनर्स, पोस्टर्स व भित्तीपत्रे

८) हस्तपत्रके

९) हात धुवा मोहीम

१०) प्रदर्शने व सॅनिटेशन पार्क

११) स्वच्छता साहित्य विक्री केंद्रे

१२) गवंडी प्रशिक्षण

१३) वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर

१४) रेडिओवरील कार्यक्रम - २७ सप्टेंबर २००२ ते ३१ डिसेंबर २००२ सांगली आकाशवाणीवर दर शुक्रवारी स्वच्छतेतून समृध्दीकडे कार्यक्रम

१५) कलापथके व पथनाट्ये - शाहीर आंबी, राजेंद्र कुंभार, दत्ता शेवाळे, थळेंद्र लोखंडे इत्यादी.

१६) बक्षिसे व प्रोत्साहन - ग्रामीण स्वच्छ घर, स्वच्छ परिसर, स्वच्छ गोठा, सदृढ बालक, परसबाग, रांगोळी स्पर्धा.

१७) सहली व मेळावे - १) अभियानातील पारितोषिक प्राप्त गावांना भेटी

२) महिला, युवक, युवती, बालमेळावे

१८) तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम - १) गांडुळखत २) नेडॅप कंपोस्ट

३) निर्धूर चुल ४) युरिया रिकव्हरी प्रकल्प

५) मैला निर्गत कार्यक्रम

१९) अधिकारी व लोकप्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रम

२०) महाविद्यालयीन विद्यार्थी सहभाग - एन. एस. एस. व विद्यार्थी कल्याण मंडळाची विशेष ग्रामशिबीरे.

२१) भाषणे व परिसंवाद -

१) स्वच्छता तज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कार्यकर्ते, अधिकारी यांची अनेक भाषणे विविध गावातून झाली आहेत.

२) जिल्हा व तालुका पातळीवर लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्यासाठी संपूर्ण स्वच्छता अभियान संदर्भात परिसंवाद आयोजित करण्यात आले.[३३]

गेल्या साठ वर्षाच्या काळात भारतातील स्वच्छताविषयक जाणीव अधिक अधिक प्रगल्भ होत असलेली दिसते. पूर्वी म. फुले, म. गांधी, संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही स्वच्छतेच्या प्रसारासाठी भरपूर काम केले आहे. परंतु हे काम काही संस्था किंवा व्यक्ती यांनी विशिष्ट प्रदेशात केले आहे. त्यामुळे त्याचा परिणाम मर्यादित राहिलेला आहे. संपूर्ण भारताला प्रभावी करू शकेल अशी स्वच्छता चळवळ संयुक्त राष्ट्रसंघाने १९९१ ते २००० हे दशक स्वच्छता दशक जाहीर करेपर्यंत होऊ शकलेली नाही. जागतिक स्वच्छता दशकाच्या घोषणेनंतर भारत सरकारने आपल्या केंद्रपुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची नव्याने पुनर्रचना केली. या नव्या कार्यक्रमात अनुदानाआधारीत कार्यक्रमाऐवजी मागणी आधारीत दृष्टिकोनास प्राधान्य देण्यात आले. स्वच्छता व आरोग्य या संदर्भात लोकांचे प्रबोधन केल्यास, त्यांना स्विकारण्यायोग्य स्वच्छता तंत्रज्ञान उपलब्ध केल्यास आणि महत्वाच्या व उपयोगी व्यक्तींना संवाद व तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिल्यास लोकांना स्वच्छतेचे

महत्व पटेल. आणि ते स्वत:हून स्वच्छता कार्यक्रमाचा स्विकार करतील असा दृष्टिकोन मांडून भारत सरकारने संपूर्ण स्वच्छता अभियानास सुरूवात केली. देशामध्ये प्रथमच सरकारी कार्यक्रमास अभियान किंवा चळवळ म्हणून संबोधण्यात आले. लोक प्रबोधन आणि लोकसहभाग ही दोन अत्यंत महत्वाची वैशिष्ट्य या संपूर्ण स्वच्छता अभियानात दिसून येतात. अभियानाच्या घोषणेनंतर अवघ्या सात वर्षात देशाच्या स्वच्छतेच्या पातळीमध्ये आमुलाग्र बदल झाल्याचे दिसते. या अभियानाच्या यशावर माहिती, शिक्षण व संवादाच्या सहाय्याने लोकांच्या दृष्टिकोनात व वर्तनात बदल घडविता येतो हे स्पष्ट झालेले आहे.

# संदर्भसूची


१. **WHO** (1987) : *Technology for water supply and sanitation in developing countries - A Report of WHO study group (WHO Technical Report Services No. 749)*

२. **Shrinivas S.** (2000) : *Management of Rural Sanitation Programme Successful Case Studies (N.I.R.D. Hydrabad)* Series No. 7 PP. 10 - 12

३. *The Handwashing Hand Book, World Bank, WSP- SA PP-9.*

४. **कुंभार यशवंत** (संपादक) (२००१) : *असे होते स्वच्छता अभियान,* सुराज्य विशेषांक, ५ जून, पृष्ठ १८.

५. **पटेल ईश्वरभाई** : *पाणीपुरवठा व स्वच्छतेमधील लोकसहभागाचे अनुभव-ट्रेनिंग हँडबुक फॉर डीस्ट्रीक्ट अँड स्टेट लेव्हल ऑफीसरस इन्हायसमेंट सॅनीटेशन इन्स्टिटट्यूट (परिसर सफाई विद्यालय, गांधी आश्रम, अहमदाबाद)* पान नं.७७.

६. **द्विवेदी प्रेमलता** (१९८०) : *सार्वजनिक आरोग्य नागपूर,* अनंत प्रकाशन, पृष्ठ ७ -८.

७. **तिजारे** (१९८३) : *सामुदायिक विकास आणि विस्तार शिक्षण, श्री विद्याबुक्स, औरंगाबाद,* पृष्ठ २९-३१.

८. **फडके य. दि.** (संपादक, १९९१) : *महात्मा फुले समग्र वाङ्मय अखंडादी काव्यरचना,* पाचवी आवृत्ती, पान नं. २९८-३०१, ५५४-५५५.

९. **व्यास एच एम** (१९६२) : *गांधी मो. क. (संपादक ग्रामस्वराज्य),* नवजीवन पब्लिशींग हाऊस, अहमदाबाद.

१०. **धर्माधिकारी भाऊ** (अनुवादक-संपादक) १९८८ *: गांधी विचार दर्शन आरोग्यविचार,* (द्वितीय आवृत्ती) पुणे : गांधी वाङ्मय प्रकाशन समिती पृष्ठ १३०-१३६.

११. **भगत रा. तु.** (संपादक) १९९२ : *श्री गाडगेमहाराज गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.*

१२. **परदेशी रमेशचंद्र,** (जुलै २०००) : *ग्रामगीतेचे तत्त्वज्ञान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रतिष्ठान, सातारा.*

१३. **सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** (संपादक १९८८) : *सेनापती बापट वाङ्मय समग्र ग्रंथ. (खंड ४),* मुंबई. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृष्ठ २४७ -२६०.

१४. **मंगळवेढेकर राजा** (१९९४) : *कोकणचे गांधी (द्वितीय आवृत्ती) मुंबई, सर्वोदय साधना, शांताश्रम*, पृष्ठ ३०-३१.

१५. **नियोजन मंडळ, भारत सरकार** (१९७२) : म*हाराष्ट्रातील गांधी स्मारक निधीच्या ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूल्यमापन अहवाल.*

१६. **सुलभ मुव्हमेंट,** (१९९५) : *सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन नवी दिल्ली.*

१७. **Palat M,** (1998) : *Review of Sanitation Programme of the National Or Rural Sanitation Proceding, New Delhi PP. 18,19*

१८. **MORD (1986)** : *Govt of India Guidelines of CRSP.*

१९. **MORD** (2006) : *Information on Rural Water Supply and Sanitation Report by MORD GOI, Delhi PP- 62.*

२०. **MORD** (1999) : *GoI, Guidelines for Reforms in Water Supply and Sanitation Programme.*

२१. अ. युनिसेफ (२००४) : *केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (संपूर्ण स्वच्छता अभियान) पेयजल आपूर्ति विभाग ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार (मार्गदर्शक पुस्तिका)*

२१ ब. युनिसेफ (२००५) : *राजीव गांधी राष्ट्रीय पेय जल मिशन, भारत सरकार.*

२२. Government of Maharashtra on T. S. C. (2001-2005) : *Reports of Water Supply and Sanitation Department.*

२३. *Presentation by Principle Secretary GOM at world Bank meeting at Washington (Maharashtra 2006)*

२४. *शासन निर्णय क्रमांक २००० सी आर-१४१/ डब्ल्यू एस १६ दिनांक १३ सप्टेंबर २००१ महाराष्ट्र शासन.*

२५. Project Report of TSC (2000) : *Submitted by Zilla Parishad Sangli to Govt. of India.*

२६. **William Mcleod Rivera and M kalim Qamar** (2004) : *"Communication for rural development", food and agri org. United Nation*

२७. De La Fao United Nation (1989) : *Guidelines on Communication for rural development a brief for development planners and project formulators.*

२८. **Rai Urmila (2001)** : *effective communication HPH \ New Delhi,* first edition, page No.9-22

२९. **Rayudo C. S (1993) :** *Media and Communication Management, Himalaya Publishing House, first edition.*

३०. **Dr. Patel. V. M. :** *IEC consultant Environment Sanitation Institute Gandhi Ashram Ahamadabad.*

३१. *सांगली जिल्हा प्रशिक्षण हँडबुक २००१.*

३२. **Ghosh Avik (2006)** : "Communication Technology and Human development, Sage Publication, New Delhi.

३३. *सांगली जिल्हा परिषद शालेय स्वच्छता दूत कार्यक्रम अभ्यास अहवाल युनिसेफ पुरस्कृत.*

# साहित्य सर्वेक्षण

**प्रस्तावना**

वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता आणि मानवी आरोग्य यासंदर्भात अगदी प्राचीन काळापासून अनेकांनी कार्य केले असले तरी स्वच्छता कार्याचा चिकीत्सक अभ्यास अलीकडच्या काळात सुरु झाला आहे. मानवी आरोग्याच्या संदर्भात स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेऊन त्याबाबतीत प्रबोधन करण्याचा प्रयत्न महात्मा फुले, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व त्यांच्या अनुयायांनी केलेला दिसतो. परंतू त्यांच्या या कार्याचे मूल्यमापन करून त्याच्या परिणामांच्याबाबत शास्त्रीय अभ्यास झालेला दिसत नाही. ब्रिटीश काळापासून सरकारी अहवालांच्याद्वारे अशाप्रकारच्या अभ्यासाची सुरूवात झालेली आहे. या प्रकरणामध्ये स्वच्छता कार्यक्रम याबाबत सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, समाजशास्त्रज्ञ इत्यादींनी तयार केलेले मूल्यमापनात्मक अहवाल तसेच विविध संशोधकांनी याविषयी केलेले संशोधन यांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये भारत सरकार, महाराष्ट्र सरकार, जागतिक आरोग्य संघटना, संयुक्त राष्ट्र संघटना व वेळोवेळी स्वच्छता संदर्भात गठीत करण्यात आलेल्या समित्या यांनी स्वच्छतेतील विविध प्रयोगाचे केलेले मूल्यमापन तसेच संशोधकांनी चिकीत्सकपणे केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष यांचा परामर्ष घेण्यात आला आहे.

**१) ब्रिटीशांच्या स्वच्छताविषयक कार्याचा आढावा प्रेमलता द्विवेदी यांनी १९८० साली प्रकाशित केलेल्या सार्वजनिक आरोग्य** या पुस्तकात उत्तम रितीने घेतलेला दिसतो. इ. स. १८५७ मध्ये ब्रिटीश सरकारचा अंमल भारतात सुरू झाला. त्यावेळेस ब्रिटीशांनी स्वच्छतेच्या संदर्भामध्ये विशेष आयोगाची स्थापना केली. या आयोगाने सादर केलेल्या अहवालात मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतातील सार्वजनिक स्वच्छतेवर विशेष भर देण्याची शिफारस केली होती. त्यास अनुसरून १८९७ पर्यंत कार्यक्रम आखण्यात आले व १८९७ साली नवे सॅनिटरी कमिशनने लोकांना सार्वजनिक स्वच्छतेबद्दल माहिती देणे,

स्वच्छतेचा आरोग्याशी असलेला संबंध समजावून सांगणे व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ रहावे यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजणे यासारख्या शिफारशी केल्या होत्या. या शिफारशींची अंमलबजावणी १९११ पर्यंत उत्तमरितीने झाली. परंतू १९११ मध्ये रिफॉर्म ॲक्ट अस्तित्वात आला व स्वच्छता व आरोग्यविषयक कामे केंद्राऐवजी प्रांताकडे सोपविण्यात आली. त्यामुळे या कार्यक्रमाची सुसूत्रता कमी झाली.[१]

**२) भारत सरकार, (१९७२) महाराष्ट्रातील गांधी स्मारक निधीच्या ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मुल्यमापनात्मक अहवालामध्ये** महात्मा गांधीनी स्वच्छतेला अतिशय प्राधान्य दिलेले होते व स्वच्छता, परिसर स्वच्छता याबाबत त्यांनी आपल्या भाषणातून तसेच हरीजन या वृत्तपत्रातून लोकांचे प्रबोधन केले आहे. त्यांनी ग्रामीण भागात सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना उद्देशून असे म्हटले आहे की प्रत्येकाने झाडू आणि पाणी घेऊन आपले घर व परिसर स्वच्छ करावा तसेच साऱ्या गावाची स्वच्छता करण्यासाठी मदत करावी. स्वच्छतेच्या कामाला बळकटी येण्यासाठी त्यांनी सेवाग्रामसारख्या संस्था स्थापन केल्या व ग्रामस्वच्छतेचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण केले. त्यांनी आपल्या मोहिमेला भंगी मुक्ती योजना असे नाव दिले. प्रत्यक्षात हा स्वातंत्र्य भारतातील १ ला ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम होता. त्यांनी महाराष्ट्राच्या २७ जिल्ह्यांमध्ये ७०००० शौचालये व ५०० बायोगॅस सयंत्रांची बांधणी केली. स्मारक निधीच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी भारत सरकारने १९७२ साली योजना आयोगाच्या अखत्यारीत एक समिती स्थापन केली.

या समितीने केलेल्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१) स्मारक निधीच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करून त्याच्या सार्वत्रिक स्विकाराची शक्यता पडताळून पाहणे.

२) नव्या पध्दतीची शौचालय स्विकारलेल्या लोकांचे अनुभव व प्रतिक्रीया तपासणे.

३) कार्यक्रमाच्या स्विकारामध्ये येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

वरील उद्दिष्टानुसार केलेल्या अभ्यासावरून खालील निरीक्षणे नोंदविण्यात आली.

१) गांधी स्मारक निधीची शौचालय वापरणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या मते या शौचालयामुळे गावातील स्वच्छता व आरोग्य यांच्या स्थितीत सुधारणा झाली व स्त्रिया व मुले यांची खूपच सोय झाली.

२) शौचालय न स्विकारणाऱ्यांनी सुध्दा योजनेची प्रशंसा केली, परंतु शौचालयाच्या अधिक किंमतीमुळे किंवा जागा नसल्याने शौचालय बांधण्याच्या बाबतीत असमर्थता दर्शविली.

३) योजनेच्या अंमलबजावणीमधील प्रमुख अडथळा अनुदानाचा अभाव आहे.

या अहवालामध्ये प्रथमच ग्रामीण भागातील उघड्यावर शौचास बसण्याच्या सवयीचे विश्लेषण केले. १९७० पर्यंत निधीचे काम उत्तमपणे चालले, परंतु पुढे अनुदानामध्ये कपात झाल्याने १९६४-७० या काळात कामाने घेतलेला वेग १९७० च्या पुढे राखता आला नाही.[२]

**३) युनिसेफच्या न्युयार्क येथील मुख्यालयाने २००१ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालात नमूद केले आहे.** हा अहवाल म्हणजे भारताच्या ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमातील युनिसेफच्या योगदानाचा विश्वासार्ह दस्तऐवज आहे. युनिसेफने या संयुक्त राष्ट्र संघाच्या मुलांच्याविषयक काम करणाऱ्या संस्थेने १९६६ पासून भारत सरकारबरोबर पाणी व परिसर स्वच्छता या कार्यक्रमात काम करण्यास सुरूवात केली. सुरूवातीच्या काळात बिहार व उत्तरप्रदेशातील दुष्काळी भागात विंधन विहीरी खोदण्यापुरते हे काम मर्यादीत होते. सन १९८० मध्ये कार्यक्रमाचा विस्तार, स्वच्छता व आरोग्य जागृती या क्षेत्रामध्ये वाढविण्यात आला. युनिसेफच्या सहकार्यानेच भारत सरकारचे लक्ष आरोग्य जागृती व वर्तनबदल यावर अधिक-अधिक लक्ष केंद्रीत होत गेले. युनिसेफचा १९९८-२००२ या काळातील मास्टर प्लॅन आपल्या प्राथमिकता स्पष्ट करून सांगतो. या प्लॅनमध्ये असे म्हटले आहे की देशातील प्रत्येक मुलाला शुध्द पाणी व स्वच्छ परिसर प्राप्त करण्याचा हक्क आहे आणि त्यासाठी देशाने केलेल्या प्रयत्नात युनिसेफ मदत करेल.

**युनिसेफने खालील धोरण निश्चित केले.**

१) लोकांच्यामधील वर्तनबदल साध्य करण्यासाठी आरोग्य शिक्षणास प्रोत्साहन देणे.

२) पाणी व परिसर यांची गुणवत्ता व चिरंतनता सुधारणे.

३) लोकसहभाग वाढविणे.

४) नवविचारांना प्रोत्साहन देणे.

१९८९ मध्ये युनिसेफने देशव्यापी पाणी, स्वच्छता व आरोग्य यांचा आढावा घेतला. त्याला अनुसरून भारत सरकारने आपल्या केंद्रपुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये सुधारणा केली. १९९३ मध्ये युनिसेफने महिला गवंडीकाम प्रशिक्षणास सुरूवात केली. १९९५ मध्ये शाळा स्वच्छता कार्यक्रमांना प्राधान्य दिले. १९९८ मध्ये युनिसेफने ९९-२००२ या काळासाठी नवा मास्टर प्लॅन जाहीर केला. ज्यामध्ये शौचालय बांधणीचे अनुदान पूर्णपणे समाप्त करण्यात आले. भारतासाठी युनिसेफने WES (पाणी व परिसर स्वच्छता) कार्यक्रमांतर्गत ३ प्रकल्प मंजूर केले.

**प्रकल्प**

१) गृहस्वच्छता, शौचालय सुविधा व पेयजल पूर्तता

२) शालेय शौचालये आणि आरोग्य शिक्षण

३) पाणी व स्वच्छता कार्यक्रमाचे लोकव्यवस्थापन व स्वच्छ जलस्त्रोतांचा विकास. या सर्व गोष्टी अहवालात नमूद केल्या आहेत.[३]

**४) २००१ साली जागतिक आरोग्य संघटनेने जीनीवा येथून आरोग्य व परिसर स्वच्छता या विषयक महत्त्वपूर्ण अहवाल प्रसिध्द केला.** या अहवालामध्ये असे म्हटले आहे पाणी, स्वच्छता, आरोग्य व मानवी सौख्य यांच्यामध्ये सरळसरळ सहसंबंध असतो.

१) दुषित पाणी पिणे.

२) मानवी विष्ठेची विल्हेवाट न लावणे.

३) वैयक्तिक स्वच्छतेबद्दल जागृती नसणे आणि केरकचरा व सांडपाण्याची योग्य विल्हेवाट न लावणे. यामुळे समाजात अनेक रोग उद्‌भवतात. परिणामी कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण वाढते. याचाच परिणाम म्हणून त्या त्या देशाचा आरोग्य निर्देशांक ढासळतो.[४]

**५) एम. ब्लॅक व आर. टॅलबोट यांनी लिहीलेल्या** A Matter of life and Health **या पुस्तकात** मानवी शरीरातून बाहेर टाकलेली टाकाऊ द्रव्ये व त्यांचा आरोग्यावरील परिणाम यांचा विस्तृत उहापोह केलेला आहे. ते म्हणतात दरवर्षी माणूस ५०० लिटर मूत्र व ५० लिटर विष्ठा बाहेर टाकतो. यापैकी मुत्र हे निरूपद्रवी असते. पण मानवी विष्ठेमध्ये आरोग्यावर अत्यंत वाईट परिणाम होतो. विष्ठेमधून गॅस्ट्रो, टायफॉईड, कॉलरा यासारखे अनेक साथीचे रोग पसरतात.[५]

**६)** याच स्वरूपाचा अभ्यास **के. कवाटा यांनी आपल्या अमेरिकन जनरल ऑफ मेंटल इथिकल न्युट्रीशन या संशोधन पत्रिकेतील लेखात** केलेला दिसतो. ते म्हणतात केवळ १ ग्रॅम मानवी विष्ठेमध्ये १ कोटी विषाणू व १० लाख जीवाणू असतात. हे रोगजंतू आजारी व्यक्तीपासून निरोगी व्यक्तीकडे उघड्यावर शौचास बसल्याने पाणी, कीटक, जमीन, अन्न या विविध मार्गाने पोहोचतात.[६]

**७) भारत सरकारने ढाका, बांग्लादेश येथे झालेल्या स्वच्छताविषयक दक्षिण आशियाई परिषदेत संपूर्ण स्वच्छता व आरोग्यविषयक दृष्टीकोन स्पष्ट केला** आहे. या सरकारी दस्तऐवजात भारताच्या स्वच्छता कार्यक्रमाचा विकास वर्णन केला आहे. यामध्ये स्वच्छतेला कमीतकमी महत्त्व असणाऱ्या काळापासून जल व स्वच्छता कार्यक्रमापर्यंतचा इतिहास वर्णन केला आहे. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमातील अनुदानाधारीत कार्यक्रमाचे मूल्यमापन करून संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या स्वरूपाबद्दल सखोल विवेचन केले आहे. यामध्ये प्रथमच संवाद कार्यक्रमाचा उद्देश लोकांचे वर्तन बदलणे हा आहे असे ठामपणे प्रतिपादन केले आहे. १९९० च्या दरम्यान मनुष्य बळ विकास आणि माहिती, शिक्षण आणि संवाद हे दोन्ही कक्ष वेगवेगळे असणे परिणामकारक ठरत नाही. हे मान्य करून क्षमता विकास केंद्रे आणि संवाद यांचे एकत्र नियोजन करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. स्वच्छता कार्यक्रमास भरपूर अनुदान देण्याचे कमी किंवा शून्य अनुदान धोरण अवलंबण्याचे ठरवले. पुढील पिढीच्या वर्तनात बदल व्हावा म्हणून शालेय स्वच्छता व आरोग्य शिक्षण कार्यक्रमावर

भर देण्याचे निश्चित केले. लोकांच्या मते स्पर्धात्मकता वाढावी म्हणून चांगले कार्यक्रम करणाऱ्या गावांना निर्मलग्राम पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले. या संशोधन निबंधात नव्या संपूर्ण स्वच्छता अभियानाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) स्वच्छताविषयक तंत्रज्ञानाचे अभिनव स्वस्त व शास्त्रीय पर्याय उपलब्ध करून देणे.

२) ग्रामीण स्वच्छता केंद्र व निर्मिती केंद्रे यांच्या सहाय्याने स्वच्छता व शौचालय बांधणी विषयक सांधनांचा पुरवठा सुनिश्चित करणे.

३) बचतगटांना संपूर्ण स्वच्छता अभियानात प्राधान्याने सहभागी करून घेणे.

४) संवाद कार्यक्रमामध्ये स्त्रियांच्यावर लक्ष केंद्रीत करणे.

५) प्रदूषणाबाबत लोकशिक्षणाचा कार्यक्रम आखणे.

६) लाभार्थींचा सहभाग मिळविणे.

७) समन्वयात्मक व एकात्मिक दृष्टीकोन अंगिकारणे.[७]

**८) ग्रामीण स्वच्छता या लेखामध्ये डॉ. एच. एन. धर्माधिकारी लिहितात,** प्रचंड वाढलेली लोकसंख्या आणि उपलब्ध तुटपुंजी साधनसामुग्री, यांचा मेळ न बसल्याने स्वच्छता संपुष्टात येते. तसेच स्वच्छता करणे व टिकविणे या दोन्ही बाबी जशा अपुऱ्या साधन सामुग्रीमुळे शक्य होत नाहीत. तशा जनतेमध्ये आरोग्यविषयक सामूहिक जाणीव निर्माण झाल्याशिवाय स्वच्छतेची कोणतीही योजना कार्यान्वित व फलद्रूप होऊ शकत नाही. ग्रामीण स्वच्छता याकडे सर्वांकडून इतर योजनेच्या तुलनेने मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. यासाठी एका प्रचंड कार्यक्रमाचे नियोजन करणे अत्यावश्यक आहे. यासंदर्भात इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्युकेशनने काही उपाययोजना सुचविल्या आहेत..

१) ग्रामीण भागातील जनतेला स्वच्छताविषयक आरोग्य शिक्षण विविध दृकश्राव्य व आवडेल अशा माध्यमाद्वारे देणे.

२) शौचकूपाचा वापर करण्यास प्रवृत्त करणे.[८]

**९) ग्रामीण सार्वजनिक स्वच्छतेबाबत भारतीय समाजविज्ञान अनुसंधान (इंडियन कौन्सिल ऑफ सोशल अँड सायंटीफिक रिसर्च आयसी एस एस आर) आणि भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान (इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ सायन्सेस आय-आय एम एस) या संस्थांचा संयुक्त अहवाल म्हणतो,** ग्रामीण स्वच्छतेच्या प्रश्नाकडे पराकाष्टेचे दुर्लक्ष झालेले आहे. बहुसंख्य ग्रामीण लोकांची परिस्थिती प्राथमिक स्वरूपाची आहे. ग्रामीण स्वच्छतेचा त्वरीत आणि काटकसरीने विकास साधायचा असेल तर त्यांच्याकडे पुरेसे लक्ष देणे आवश्यक आहे.

१) खेड्यांची स्वच्छता राखण्यामध्ये लोकांचा स्वावलंबनावर व सहकार्यावर भर असावा.

२) कामाच्या जबाबदाऱ्या कुटुंबावर टाकल्या पाहिजेत आणि त्या पार पाडण्यासाठी शिक्षण आणि पर्यवेक्षण यावर भर दिला पाहिजे.

३) ग्रामीण स्वच्छतेच्या सुधारणा कार्यक्रम स्थानिक समित्यांकडून उत्तमरीतीने अंमलात येऊ शकतील. त्यांना तांत्रिक मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य राज्यशासनाकडून मिळायला हवे. हे धोरण असले पाहिजे.[१]

**१०) महाराष्ट्र शासनाने लोकराज्य या मासिकात (१६ ऑगस्ट १९९५) मध्ये प्रकाशित केलेल्या ग्रामविकास मंत्री अण्णा डांगे म्हणतात,** महाराष्ट्रात राज्यातील ग्रामीण भागात ९६ ते १०६ कुटुंबे आहेत परंतु त्यापैकी ५.५ ते ६ लाख कुटुंबे सोडल्यास बाकी परिवारांकडे आजही संडास किंवा स्वच्छतागृहे नाहीत म्हणजे जवळजवळ ९० ते ९५ टक्के ग्रामीण जनता आजही आपले स्वच्छतेचे विधी उघड्यावरच उरकताना दिसतात. प्रबोधनाच्या अभावामुळे आज सुशिक्षित झालेल्या एखाद्या व्यक्तीने आपल्या घरात संडास बांधला तरीही घरातील इतर परंपरावादी सदस्य पूर्वसंस्कारामुळे या संडासचा वापर करण्याच्याबाबतीत टाळाटाळ करतात. ही जी ग्रामीण जनतेची मानसिकता आहे ती बदलणे आज अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी

१) ग्रामीण भागात नव्या घरबांधणीला परवानगी देताना शौचकूप बांधणे बंधनकारक करावे लागेल.

२) ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी आपल्या घरातून शौचकूप बांधणे सक्तीचे करावे लागेल असे झाल्यास स्वच्छतेची जाणीव वरपासून खालपर्यंत झिरपू शकेल. नेतृत्व करणाऱ्यांनी ही जाणीव अंगवळणी पाडली की तिचा प्रसार आपोआप होईल.[१०]

**११) श्री धर्माधिकारी भाऊ यांनी अनुवादीत केलेल्या गांधी विचार दर्शन या ग्रंथातील** आरोग्यविचार या विभागात महात्मा गांधी यांनी सफाई, व्यक्तिगत स्वच्छता, ग्रामसफाई व सफाई या गोष्टी शिकवल्या जाव्यात. कारण यामध्येच बाकीचे सर्व शिक्षण येत असते. लोक सामान्यपणे देवळे, मशिदी, चर्च स्वच्छ ठेवतात. परंतू ईश्वराचे सर्वव्यापी अस्तित्व मान्य करून सुध्दा बाकीची ठिकाणे स्वच्छ केली जात नाहीत. सफाई, सच्चेपणा, पावित्र्य आणि नीटनेटकेपणा हे चार शब्द त्यांनी एका अर्थी वापरले आहेत. स्वच्छता ही साधुत्वाच्या खालोखाल असते म्हणजे मनाप्रमाणेच जर शरीरदेखील अस्वच्छ असेल तर ईश्वराच्या कृपाशिर्वादाचा काही लाभ होणार नाही. आपण शरीराची घाण स्वच्छ करण्यासाठी स्नान करतो पण त्यातून घाण पाणी निर्माण होते. नद्यांकाठी केलेल्या घाणीचे प्रतिफळ म्हणून आपल्याला रोग मिळतात ही अस्वच्छ परिस्थिती दूर ठेवण्यासाठी आपण आरोग्यकारक सफाई व राहणी यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

१) आपण गावाची स्वच्छता नियमितपणे केली तर गावातील आजार कमी होतील.

२) आपण आजारांपेक्षा आजार प्रतिबंधक गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे.

३) ग्रामीण स्वच्छतेमध्ये तळी व विहीरी स्वच्छ ठेवणे, उकीरडे साफ ठेवणे, रस्ते व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे व टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त वस्तूची निर्मिती करणे यावर भर दिला पाहिजे. खेड्यातील पाणीपुरवठा स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

४) ग्रामीण लोकांनी जर स्वखुषीने सफाईकडे लक्ष दिले तर आरोग्यासाठी लागणारा खर्च आपोआप कमी होईल. गावे अस्वच्छतेची माहेरघर बनली आहेत. अस्वच्छतमुळे बालमृत्यू,

अपमृत्यू व अनेक प्रकारचे आजार होतात. या सर्वांवर परिणामकारक उपाय म्हणजे स्वच्छतेकडे लक्ष पुरविणे होय. शौचासाठी उघड्यावर न बसता शेतामध्ये चर खणून त्यामध्ये मैला टाकला तर त्याचे शेतीसाठी उपयोगी चांगल्या प्रकारचे खत तयार होईल. त्यामुळे शेतीचे उत्पादन देखील वाढेल. गावात रोगजंतू होणार नाहीत व पर्यायाने गाव स्वच्छ राहू शकेल अशी त्यांची विचारसरणी होती.[११]

**१२) रूरल सॅनिटेशन : अजेंडा फॉर फ्युचर पॉलीसिज, प्रोग्रॅम्स अँड स्ट्रॅटेजीज कुरूक्षेत्र मध्ये डॉ. एस. पोन्नुराज लिहितात,** ग्रामस्वच्छता या शिर्षकाखाली पिण्याच्या पाण्याची सुरक्षित हाताळणी, सांडपाणी व घणकचरा यांची विल्हेवाट मानवी मलमूत्राची निर्गत, घरगुती स्वच्छता, अन्न पदार्थांची सुरक्षितता, वैयक्तिक स्वच्छता आणि ग्राम स्वच्छता यांना एकत्रितरीत्या पुरस्कृत केले जाते. ग्रामस्वच्छता कार्यक्रम राबविण्यात पश्चिम बंगाल व पूर्वेकडील राज्ये आघाडीवर आहेत. तथापि इतर राज्यात हे कार्यक्रम राबवण्यामध्ये १) राज्यशासनाच्या राजकीय इच्छेचा अभाव व कार्यकर्त्यांना दिला जाणारा कमी अग्रक्रम २) स्वच्छताप्रेमी लोकांची उदासीनता ३) स्वच्छता, शिक्षण व माहिती यावर दिला जाणारा कमी भर केवळ एकाच नमुन्याचे पुरस्करण ४) उपभोक्त्यांच्या नक्की गरजा समजून घेण्याऐवजी अनुदानावर देण्यात येणारा भर व ५) लोकसहभागाचा अभाव यासारखे अडथळे जाणवतात. वस्तुत: ग्रामस्वच्छतेची उद्दीष्टे साध्य होण्यासाठी धाडसी दृष्टीकोन असलेल्या शासनयंत्रणेची आवश्यकता आहे. आतापर्यंत आपल्या देशात अनेक कार्यक्रम झाले आहेत. आर्थिक व राजकीय वातावरणासंदर्भात पुरवठा व अनुदान आधारीत कृतीयोजने ऐवजी मागणी आधारीत कृती योजना कार्यान्वित करणे हे खरोखरच आव्हान आहे.

ग्रामस्वच्छता अभियानासारख्या माध्यमाने रोगमुक्त भारत निर्माण करण्यासाठी आज सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे.[१२]

**१३) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि संवाद जैन्याळ एक अभ्यास असा एक लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. जे. सी. अभ्यासक्रमासाठी गीता**

**चव्हाण यांनी सादर केला आहे. या प्रबंधात** माध्यम व सामाजिक बदल यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. हा लघुप्रबंध अन्वेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीने लिहिलेला असून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेसाठी माध्यमांचा उपयोग व लोकांना माहिती मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी यावर प्रकाश टाकला. त्यांच्या मते ग्रामस्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेमध्ये मुद्रीत व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या इतकेच महत्त्व ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना आहे. याचा अर्थ असा की जनसंपर्क माध्यमांच्या बरोबरच प्रत्यक्ष व्यक्तीव्यक्तीमधील संवाद व स्थानिक पातळीवरील तज्ञांकडून मिळालेली माहिती लोकांच्या मनोवृत्तीत बदल घडवण्यास कारणीभूत ठरते. जैन्याळ ग्रामविकासामध्ये दूरचित्रवाणीपेक्षा रेडीओची भूमिका तुलनेने जास्त आहे.[१३]

**१४) शीला रामपुरे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फील. पदवीसाठी एप्रिल २००७ मध्ये ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि त्यांचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव या विषयावर प्रबंध सादर केला आहे.** या प्रश्नांच्या शोधासाठी त्यांनी सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील दोन निवडक गावांचा अभ्यास केला आहे. या संशोधनामध्ये खालील निष्कर्ष काढलेले दिसून येतात. १) अभियानातील प्रबोधन कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांना घराबाहेर पडून सामाजिक जीवनात भाग घेता आला. २) संवाद कार्यक्रमांच्यामुळे महिलांच्या जाणीवा प्रगल्भ झाल्या. ३) महिलांचा सहभाग नसल्यास अभियानातील कार्यक्रम यशस्वी होत नाहीत. ४) ग्रामस्वच्छता अभियानातील संवाद कार्यक्रमांच्यामुळे नवीन तंत्रांचा लोकांनी वापर केला. यामध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.[१४]

**१५) डॉ. बिंदेश्वर पाठक यांनी २००४ मध्ये रोड टू फ्रिडम - अ सोशालॉजिकल स्टडी ऑन द अॅबॉलीशन ऑफ स्कॅव्हेंजिंग इन इंडिया** यामध्ये भंगी मुक्ती योजनेवर भर दिल्याचे आढळते. त्यांनी भारतातील भंगी मुक्ती एक सामाजिक अभ्यास या विषयावर संशोधन प्रबंध लिहिलेला आहे.

या प्रबंधात त्यांनी भंगी कामापासून मुक्ततेसाठी स्वस्त शौचालयाच्या बांधणीची सामाजिक बाजू विशद केली आहे. या संशोधनाचे फलित म्हणजे सुलभ इंटरनॅशनल या शौचालय विषयक संस्थेची स्थापना डॉ. पाठक यांच्या संशोधनातून १९६० च्या विशेष ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांचा विश्वासार्ह दस्तऐवज आहे. या संशोधनात त्यांनी १) बिहारमधील स्वच्छताविषयक परिस्थिती २) स्वस्त शौचालयाच्या पर्यायाच्या सहाय्याने पारंपरिक सवयींवर कशी मात करता येईल. ३) भंग्यांनी डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या अमानुष पध्दतीचे उच्चाटन कसे करता येईल. याबाबत शास्त्रीय विवेचन केले आहे. त्याचबरोबर मुक्त झालेल्या भंग्यांचे पुनर्वसन करण्याचे उपायदेखील सुचविले आहेत. सुलभ शौचालय योजना ही स्वातंत्र्यपूर्व भारतातील स्वच्छताविषयक चळवळीचे फलित आहे. ही योजना केवळ भंगीमुक्तीसाठीच नाही तर एकूण शौचालय व स्वच्छता याबाबतीत लोकमानस बदलण्यासाठी प्रभावी ठरली. संपूर्ण भारतीय समाजात तिने एक वादळ उठविले आणि जगाचेही लक्ष वेधून घेतले. सुलभ शौचालय योजनेने सर्वोदय चळवळीचे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरविले.[१५]

१६) Environmental Sanitation Institute **गांधी आश्रम, अहमदाबाद या संस्थेने** स्वच्छता तंत्रज्ञानाचे संशोधन व प्रसार या क्षेत्रात अद्वितीय असे काम केले. ग्रामीण स्वच्छताविषयक माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमांचे व्यवस्थापन व परिणाम याबाबत संस्थेतील संशोधकांनी तयार केलेले संशोधन निबंध जिल्हा व राज्य स्तरावरील अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी तयार केलेल्या हस्तपुस्तिकेत ग्रंथीत केलेले आहेत. ही हस्तपुस्तिका जागतिक आरोग्य संघटनेने पुरस्कृत केलेली आहे. अहमदाबाद येथील सफाई विद्यालयाचे संचालक ईश्वरभाई पटेल यांनी आपल्या टेक्नॉलॉजीकल ऑप्शन अँड सॅनिटेशन अप ग्रेडेशन या लेखात शोष खड्याच्या संडाससह अनेक तंत्रज्ञानात्मक पर्याय विशद केले आहेत. त्याचबरोबर त्यांनी स्वच्छता कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुयोग्य तंत्रज्ञानाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. अशाच प्रकारचे तंत्रज्ञानाचे महत्त्व विज्ञान व तंत्रज्ञान

विभागाचे सल्लागार डॉ. पी. पी. ओझा यांनी सांगितले आहे. ते म्हणतात, सुयोग्य तंत्रज्ञान हे स्वस्त असावे लागते परंतु कमी दर्जाचे नसावे.[१६]

**१७) मार्च १९७७ मध्ये अशाच प्रकारचे अर्जेंटीना येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाच्या पाणी परिषदेने निवेदन प्रस्तुत केले आहे** त्याचा आशय खालीलप्रमाणे विकसनशील देशांनी राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर तांत्रिक क्षमता विकसित करायला हव्यात. त्यामध्ये कमी खर्चाच्या व स्थानिक सामुग्रीचा उपयोग करणाऱ्या तंत्रज्ञांना प्राथमिकता द्यायला हवी. तसेच स्थानिक,पर्यावरणीय घटकांनाही प्राधान्य द्यायला हवे.[१७]

**१८) सुप्रसिध्द आय ई सी (माहिती, शिक्षण व संवाद) सल्लागार डॉ. विनुभाई एम. पटेल आपल्या आरोग्य क्षेत्रातील टेक्निक या निबंधात** संवादातील घटक विशद करून त्याचे सहा प्रकार सांगतात. त्यांनी या निबंधात संवादातील समस्या व दुतर्फा संवादाची परिणामकारकता याचे महत्त्व विशद केले आहे. त्यांच्या मते १) अपुरा किंवा चुकीचा संदेश २) भाषा किंवा सामाजिकतेतील अडथळा ३) पूर्वग्रह ४) वेळेची कमतरता ५) विश्वासाचा अभाव ६) असहमती, दुर्लक्ष, अपुरी स्मरणशक्ती ७) संवादामध्ये माहितीची रेलचेल आणि घाईगर्दी असे संवादातील अडथळे सांगितले आहेत. माहिती, शिक्षण व संवादातील प्रात्यक्षिक, प्रशिक्षण व सराव यांचे महत्त्व सांगताना त्यांनी एका चिनी म्हणीचे उदाहरण दिले आहे.

*लोक जे ऐकतात ते विसरून जातात*

*लोक जे पाहताता ते लक्षात ठेवतात*

*लोक जे करून पाहतात त्यांची अंमलबजावणी करतात.*

डॉ. विनुभाई पटेल यांच्या मते वर्तनबदलासाठी कारणीभूत ठरणारे सहा महत्त्वपूर्ण घटक खालीलप्रमाणे

१) भौतिक – भिती व वेदना (त्रास) यांच्यावर आधारलेले

२) बौध्दिक – ज्ञान व कारणमीमांसा यावर आधारलेले

३) भावनिक – आशा, प्रेम व भिती यावर आधारलेले

४) कौशल्ये – नवीन वर्तन स्विकारण्याची क्षमता

५) कुटूंब व मित्रमंडळी

६) सामाजिक रचना

वरील घटकांचा योग्य पध्दतीने वापर करून संपूर्ण स्वच्छता अभियानात माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन करता येते.[१८]

**१९) भारत सरकारने राष्ट्रीय माहिती केंद्राच्या वेबसाईटवर प्रकाशित केलेल्या स्ट्रॅटेजिक कम्युनिकेशन फॉर टोटल सॅनिटेशन कॅम्पेन या दस्तऐवजात** माहिती, शिक्षण व संवादाचे महत्त्व, पंचायती राजसंस्था, जनता व शासनाच्या पातळीवर अंमलबजावणी यांची संपूर्ण माहिती दिली आहे. या दस्तऐवजाच्या प्रस्तावनेमध्ये ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा आढावा घेतलेला असून बंगालमधील स्वच्छता कार्यक्रम व महाराष्ट्रातील संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाची प्रशंसा केली आहे. भारतातील विविध राज्यातील शौचालय बांधणीचा तुलनात्मक आढावा घेताना हे दाखवून दिले आहे की मध्यप्रदेशातील केवळ ६ टक्के लोकांना शौचालय आहे याउलट केवळ मणिपूर, मिझोराममध्ये ८० टक्के कुटुंबामध्ये शौचालये आहेत. शहरी भागाचा विचार करता ओरिसामधील ४१ टक्के लोक शहरी कुटुंबे उघड्यावर शौचास जातात तर दिल्ली, मिझोराम व मणीपूरमधील केवळ ५ टक्के लोक शहरी कुटुंबे उघड्यावर शौचाला जावे लागते. साक्षरता किंवा सांपत्तिक स्थिती यांचा शौचालय वापराशी फारसा संबंध दिसत नाही. कारण हरियानामधील ४० टक्के लोकांकडे टीव्ही आहे. परंतु केवळ ८.८ टक्के लोकांकडे शौचालय आहेत. याउलट केरळमधील ११ टक्के लोकांकडे टीव्ही आहेत परंतु ६३ टक्के लोकांकडे शौचालय आहेत. केरळ व पश्चिम बंगालमधील शौचालयाच्या विपुलतेचे प्रमुख कारण तेथे असणाऱ्या विविध विज्ञानवादी संघटना आहेत. वरील निबंधात मानवी वर्तन बदलातील स्थान अधोरेखित करण्यासाठी पश्चिम बंगालमधील मेदिनीपूर महाराष्ट्रातील

सांगली, उत्तरप्रदेशातील झाशी आणि मध्यप्रदेशातील छींदवाडा या चार जिल्ह्याच्या अभ्यासातून खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

१) ग्रामीण भागातही लोकांच्यामधील आरोग्यविषयक शास्त्रीय जाणीवांचा अभाव आहे. तसेच अनेक गैरसमजही आहेत.

२) ग्रामीण नागरीक, स्वच्छता कार्यक्रमामुळे होणाऱ्या फायद्यांबाबत अज्ञानी आहेत.

३) अस्वच्छ परिसरामुळे महिला व मुली यांना जास्त समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्यावरील कामाचा बोजा वाढतो. असुरक्षितता व लाज याबाबतीत प्रश्न निर्माण होतात. असे आढळले की संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी महिला लवकर प्रवृत्त होतात. या अहवालाने असेही स्पष्ट केले आहेकी माहितीचे संक्रमण किंवा प्रसार ही अभियानातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

वृत्तपत्रे, चार्ट, पोस्टर्स, टीव्ही यांच्याप्रमाणेच पथनाटये, कलापथके, शाहिरी, जलसा व लोककला यांचा वापरही संवादप्रक्रीयेत महत्त्वाचा ठरतो. परंतु घरभेटी, व्यक्तीगत संवाद गावातील प्रमुख व्यक्तींना केलेले प्रयत्न यांचे महत्त्व असाधारण आहे. धोरण ठरवणारे, अंमलबजावणी करणारे लोकनेते अधिकारी यांचे प्रशिक्षण ही गोष्ट अभियानाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक आहे.[१९]

**२०) सुप्रसिध्द समाजशास्त्रज्ञ अविक घोष यांनी आपल्या कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी अँड ह्यूमन डेव्हलपमेंट या पुस्तकात** माहिती, शिक्षण व संवादाचा विविध विकास प्रक्रियांशी असलेला संबंध विशद केला आहे. कुटुंबकल्याण, आरोग्य व संपूर्ण स्वच्छता अभियान या क्षेत्रामध्ये संवाद प्रक्रीयेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. यामध्ये माहिती, शिक्षण व संवाद यांचा तौलनिक अभ्यास सादर केलेला आहे. शासनाच्या विविध विभागातील अधिकारी, नियोजनकर्ते, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक घटक व वैयक्तिक कुटुंब यांच्यासाठी संवादप्रक्रिया कशी असावी. याबाबतीत सुचना केलेली आहे. उदाहरणासाठी त्यांनी पश्चिम बंगालमधील ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा अभ्यास सादर केलेला आहे. या

पुस्तकात संवाद प्रक्रीया व वर्तनबदल यांची प्रक्रिया स्पष्ट करणारे आकृत्यांचाही उत्तम वापर करण्यात आला आहे.[२०]

**२१) जागतिक आरोग्य संघटनेने आपल्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या** Information, Education and communication- Lesion from the past; perspective for the future या लेखामध्ये शिकलेल्या गोष्टी या शिर्षकाखाली खालील गोष्टींचा अंतर्भाव केला आहे.

१) माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमाचा आरोग्यविषयक जाणीवा बदलण्यामध्ये निश्चित उपयोग होतो.

२) नव्या गोष्टी स्विकारण्याचे निर्णय व्यक्तीगत नसतात तर ते समूहाद्वारे घेतले जातात.

३) वृत्तपत्रे, रेडिओ, टीव्हीसारखी, जनसंपर्क माध्यमे कमी खर्चात खूप लोकांपर्यंत पोहोचू शकतात मात्र व्यक्तीगत व गटसंवादाशिवाय ती प्रभावी ठरू शकत नाहीत.

४) संवाद प्रक्रीयेमध्ये समोरच्या माणसाची मते समजून घेणे व शंका निरसन करणे महत्त्वाचे ठरते.

५) व्यावसायिक तज्ञांच्या मते आखलेला संवाद कार्यक्रम यशस्वी होण्याची जास्त शक्यता असते.

६) संवाद कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा व सामाजिक सेवा उपलब्ध करणे गरजेचे असते.

८) आरोग्यविषयक संवाद कार्यक्रमामध्ये मनोरंजनाच्या घटकांचा समावेश उपयोगी ठरतो.[२१]

**२२) भविष्यातील कार्यक्रमांसाठी जागतिक आरोग्य संघटनेने या लेखात** काही महत्त्वपूर्ण सुचना केलेल्या आहेत.

१) संवादाच्या कार्यक्रमांबरोबरच शिक्षण व प्रशिक्षणाचा कार्यक्रम अत्यावश्यक असतो.

२) संपूर्ण अभियानावर तज्ञांची देखरेख व कालबध्द मूल्यमापन यांचे नियोजन करावे लागेल.

३) प्रत्येक टप्प्यावर संवादक व जनता यांच्या प्रतिक्रिया समजून घेऊन कार्यक्रमामध्ये सुधारणा करावी लागेल.

४) संवादक अधिकारी, राजकीय व्यक्ती, स्वयंसेवी संस्था इत्यादींसाठी योग्य प्रकारचे प्रशिक्षण साहित्य निर्माण करावे लागेल.[२२]

**२३) डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी भारती विद्यापीठाला पीएचडी सादर केलेल्या इम्पॅक्ट स्टडी ऑफ रूरल सॅनिटेशन इन सांगली डिस्ट्रीक्ट या प्रबंधात** सांगली जिल्ह्यातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा व्यष्टी अभ्यास सादर केलेला आहे. या प्रबंधात त्यांनी भारतातील केंद्रीय ग्रामस्वच्छता कार्यक्रम व संपूर्ण स्वच्छता अभियान यांचा आकडेवारीसह विस्तृत आढावा मांडलेला आहे. जगातील विविध देशांच्या मते स्वच्छतेसाठी झालेले प्रयत्न जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ, युनडीपी व जागतिक बँक यांनी वेळोवेळी पुरस्कृत केलेले पाणी व स्वच्छता कार्यक्रम त्यासाठी घेतलेल्या भूमिका ठरवलेली उद्दिष्टे आणि देखरेख व मूल्यमापन व्यवस्था यांचीही उत्तम समीक्षा केलेली आहे. त्यांनी संशोधनासाठी सांगली जिल्ह्यातील ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा आढावा, ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमातील लोकसहभाग व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा प्रभाव ही प्रमुख उद्दीष्टे निवडलेली दिसतात. अन्वेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीने केलेल्या या संशोधनाअंती खालील निष्कर्ष काढलेले दिसतात.

१) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामध्ये सामान्य जनतेचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

२) संवाद प्रक्रियेमध्ये व माहिती वितरणामध्ये ग्रामसेवक, सरपंच आणि अंगणवाडी कार्यकर्त्यांनी स्पृहणीय काम केले.

३) प्रसारमाध्यमांनी अभियानाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रसार माध्यमांपैकी रेडिओची कामगिरी विशेषत्वाने पोहोचविली.

४) प्रभातफेऱ्या, भाषणे यांचा प्रभाव अभियानात आघाडीवर असणाऱ्या गावामध्ये अधिक आढळला तर कलापथके शाहिरी जलसे यासारख्या लोककलांनी प्रगतीशील व मागास गावांच्यामध्ये सारखीच भूमिका बजावली.

५) माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमातील प्रबोधनात्मक व कार्यात्मक कार्यक्रमांनी ग्रामीण भागामध्ये टिकाऊ प्रभाव निर्माण केला आहे. परिणामी खेड्यांच्यामध्ये शौचालयांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली तसेच समाजामध्ये वैयक्तिक स्वच्छता व सर्वजनिक आरोग्य यासंबंधात महत्त्वपूर्ण वर्तन बदल आढळतो.

६) माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमामध्ये स्वयंसेवी संघटनांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असली तरी चांगल्या संस्थांचा अभाव हे सांगली जिल्ह्यातील कार्यक्रमामध्ये सर्वात दुबळी कडी आहे.[२३]

**२४) स्थितप्रज्ञन राय यांनी सोशालॉजीकल बुलेटीन या संशोधन पत्रिकेत** लिहिलेल्या हिमाचल प्रदेशातील ग्रामपंचायतीत आणि आरोग्य सेवा वितरण या संशोधन निब्रंधामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण मुद्यांवर प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात ग्रामपंचायतीत सदस्यांकडे असलेला माहितीचा अभाव प्रशिक्षणाच्या अभावी समाजाच्या गरजा समजावून घेवून त्यांचे व्यवस्थापन करण्याच्या कौशल्याचा अभाव व अधिकारी, लोकनियुक्त अधिकारी आणि लोक यांच्यामधील संवादाचा अभाव यामुळे हिमाचल प्रदेशातील आरोग्यसेवा लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यांनी असेही नमूद केले आहे की केवळ सत्तेचे विकेंद्रीकरण करून किंवा पंचायतीला ज्यादा अधिकार देवून काम भागत नाही. आणि सरकारी आदेश किंवा सक्ती यामुळेही लोकांचे कल्याण होऊ शकत नाही. त्याबरोबरच माहिती, शिक्षण व संवाद यांच्या साहाय्याने पंचायत सदस्यांची व समाजाची ज्ञानाची पातळी वाढविणे हाच त्यावर उपाय आहे.[२४]

**२५) मॅन ॲन्ड डेव्हलपमेंट या संशोधन पत्रिकेत बी. के. पटनायक आणि मदनमोहन सिंग या दोन शास्त्रज्ञांचा संशोधन निबंध प्रसिध्द** झाला आहे. यामध्ये स्वच्छता कार्यक्रमातील सर्वात महत्त्वाचा घटक असणाऱ्या शौचालयांच्या स्विकारासाठी कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास केला आहे. भारतातील विविध राज्यातील खेड्यांच्या सर्वेक्षणातून त्यांनी असे दाखवून दिले आहे की अगदी पंजाबसारख्या विकसित राज्यामध्येही ५० टक्के कुटुंबाना दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाना उपलब्ध असणाऱ्या शौचालयांची संख्या

अगदीच कमी आहे. शौचालय असणाऱ्या लोकांनी सोय व लज्जा हे शौचालय बांधणीसाठीचे प्रमुख कारण म्हणून केले आहे तर शौचालय नसणाऱ्यांनी आर्थिक अडचण हे शौचालय न बांधण्याचे प्रमुख कारण सांगितले आहे. दारिद्र्यरेषेखालील जवळजवळ ४५ टक्के कुटुंबानी आपली शौचालये अनुदानातून बांधली आहेत. या दोघा शास्त्रज्ञांनी अनुदान देताना झालेले गैरप्रकार, लाभार्थी निवडीतील अपारदर्शकता या गोष्टींना ग्रामपंचायत जबाबदार असल्याचे स्पष्ट केले आहे. याशिवाय संपूर्ण स्वच्छता अभियानाचा आर्थिक स्त्रोतामधून झालेले शौचालयांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याने अनेक गावांमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियानास खीळ बसली आहे. या प्रकरणात स्वच्छता व आरोग्य यासंदर्भात अनेक समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते यांनी केलेल्या स्वच्छतेविषयक प्रबोधनाचा व कार्याचा आढावा घेतला आहे. आजपर्यंत झालेल्या स्वच्छताविषयक कार्याचे मूल्यमापन शासकीय, बिगर शासकीय तसेच आंतरराष्ट्रीय अहवालामधून पहावयास मिळते. या सर्व अहवालांचे निष्कर्ष व शिफारशी यांचे परिशीलन करण्यात आले.[२५]

**२६) राजेंद्र कांबळे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या पीएच. डी. पदवीसाठी जून २००६ मध्ये नवव्या पंचवार्षीक योजनेच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा सामाजिक-राजकीय जीवनावर पडलेला प्रभाव एक अभ्यास** या विषयावर प्रबंध सादर केला आहे. या प्रश्नांच्या शोधासाठी त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील सात पुरस्कार प्राप्त गावातील अभ्यास केला आहे. या संशोधनामध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा मुख्य हेतू जरी राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेत आरोग्यविषयक जाणीवजागृती करण्याचा होता, तरी लोकसहभागातून हे अभियान राबविले गेल्यामुळे त्याचे दैनंदिन ग्रामीण जीवनावर आर्थीक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मीक क्षेत्रात देखील परिणाम होत आहेत. या गावामध्ये एकीची वृद्धी, महिलांचा सार्वजनिक उपक्रमातील वाढता सहभाग, तरूण-तरूणींच्या विधायक दृष्टीकोनात व कार्यात

होत असलेली वाढ तसेच भेदभाव कमी होऊन सामुदायिक उपक्रम या नव्याने विकसीत होत असलेल्या जाणीवा प्रगतीसाठी उपयुक्त ठरत आहे असे निष्कर्ष काढले आहेत.[२६]

संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या संदर्भात विविध संशोधकांनी प्रसिध्द केलेले संशोधन निबंध प्रकल्प अहवाल, एम. फील. व पीएच. डी. प्रबंध यांचा आढावा चिकीत्सकपणे घेण्यात आला. माहिती, शिक्षण व संवादाचे स्वरूप त्याचे स्वच्छता अभियानातील स्थान व परिणाम याबाबत झालेले संशोधन प्रसिध्द झालेले लेख, त्यांचे परिशीलन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले. संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेसाठी माहिती, शिक्षण व संवादाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे अनेक अभ्यासकांनी नमूद केले आहे. परंतु यातील प्रत्येक घटकाची अभियानाच्या यशस्वीतेमधील परिणामकारकता तपासणे गरजेचे आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन प्रबंधात माहिती, शिक्षण व संवादाची अंमलबजावणी नीटपणे झाल्यास लोकांच्यात कोणते वर्तनबदल होतात व त्यांच्या अभावामुळे अभियानाची परिणामकारकता कशी कमी होते याचा अभ्यास पुढील प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

***

# संदर्भ


१. **द्विवेदी प्रेमलता** (१९८०) : *सार्वजनिक आरोग्य*, नागपूर, अनंत प्रकाशन पृष्ठ ७-८.

२. **नियोजन मंडळ, भारत सरकार (१९७२)** : *महाराष्ट्रातील गांधी स्मारक निधीच्या ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूल्यमापन अहवाल.*

३. **युनिसेफ (२०००)** : *युनिसेफच्या पाणी व परिसर स्वच्छता कार्यक्रमाचा मूल्यमापन अहवाल.*

४. **जागतिक आरोग्य संघटना WHO (२००१)** : *जागतिक आरोग्य संघटनेच्या आयोगाचा आरोग्य व परिसर विषयक अहवाल, WHO जेनेव्हा.*

५. **Black and Talboat R** (2005) : *Water a matter of life and health oxphard*

६. **कवाटा के** (१९७८) : *वॉटर अँड आदर एनव्हायरन इंटरव्हेन्शनस, अमेरीकन जर्नल मेंटल ऑफ एथिकल न्यूट्रीशन* Vol- 31 PP. 2114- 2123

७. भारत सरकार (ऑक्टोबर २००३) : *Towards Total Sanitation and Hygiene- A Challenge for India South Asian Conference on Sanitation Dhaka Bangladesh*

८. **डॉ. धर्माधिकारी एच. एन. (१९९१)** : *ग्रामीण स्वच्छता लोकराज्य*, १-१५ नोव्हेंबर, पृ ८, ९.

९. **भारतीय शिक्षण संस्था (१९८५)** : *सर्वांसाठी आरोग्य पर्यायी वाटचाल : भारतीय समाजविज्ञान अनुसंधान व भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान यांच्या संयुक्त गटाचा अहवाल*, अनुवाद- प्रा. अ. के. भागवत पुणे- भारतीय शिक्षण संस्था पृष्ठ ४८-५१.

१०. **डांगे अण्णा (१९९५)** : *ग्रामविकासमंत्री, लोकराज्य, महाराष्ट्र शासन प्रकाशन*, १६ ऑगस्ट, पृष्ठ ४-६.

११. **धर्माधिकारी भाऊ** (अनुवादक- संपादक) १९८८ : गांधी विचार दर्शन, आरोग्यविचार (द्वितीय आवृत्ती) पुणे, गांधी वाङ्मय प्रकाशन समिती, पृष्ठ १३०-१३६.

१२. **पोन्नुराज डॉ. एस.** (२००२) रूरल सॅनिटेशन : *अजेंडा फॉर फ्यूचर पॉलिसीज प्रोग्रॅम्स अँड स्ट्रेटजीज कुरूक्षेत्र*, ऑक्टोबर, पृष्ठ २८,३२.

१३. **चव्हाण गीता पांडुरंग** (एप्रिल २००५) : *संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियन आणि संवाद – जैन्याळ (ता. कागल जि. कोल्हापूर) एक अभ्यास वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातील एम. जे. सी. अभ्यासक्रमाच्या पुर्ततेसाठी शिवाजी विद्यापीठास सादर केलेला लघुप्रबंध*

१४. **रामपुरे शीला महादेव** (जून २००७) : *ग्राम स्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि त्यांचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील दोन निवडक गावांचा अभ्यास : समाजशास्त्र विभाग, एम. फील, साठी केलेला शोधनिबंध, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.*

१५. **डॉ. पाठक बिंदेश्वर** २००४ : *रोड टू फ्रीडम अ सोशॅलॉजिकल स्टडी ऑन द ॲनॉलीशन ऑफ स्कॅव्हेंजींग इन इंडिया, मोतीलाल बनारसी दास पब्लीशर्स प्रायव्हेट लिमीटेड दिल्ली.*

१६. Training Programme for Total Sanitation Campaign for district and State level officers (undated) Organised by Environmental Sanitation Institute Gandhi, Asham, Ahamadabad

१७. **Water Conferance (March 1997)** : United Nations Organisation Argentina

१८. **डॉ. पटेल विनुभाई एम.** : आरोग्य क्षेत्रातील माहिती, शिक्षण व संवाद तंत्रे Training Programme for Total Sanitation Campaign Environmental Sanitation Institute Ahamadabad Page 85-93

१९. *भारत सरकार स्ट्रेटजीक कम्युनिकेशन फॉर टोटल सॅनिटेशन कॅम्पेन http; // ddws.nic. in*

२०. **Ghosh awik** (2006) : *Communication technology and Human Development, Sage Publication, New Delhi.*

२१. WHO, Information, Education and communication Lesson from the Past Perspective for the future. http; //www.who.int/reproductive-health/publications/RHR_01_22/chap 4. htm/

२२. Nutrition communication project, final report. (1996) : *Washinngton, DC. The Academy for Educational Development.*

२३. **Kalshetti Mallinath S.** (May 2007) : *Impact Study of Rural Sanitation Programme in Sangli District (A case study of sant Gadge Baba village sanitation Campaign] Ph.D Thesis submitted to Bharati Vidyapeeth University, Pune.*

२४. **Ray sthitapragyan** (January-April 2007) : *'Gram Panchayat and Health care Delivery' in Himachal Pradesh, in Sociological Bulletin,* Volume 56, Number 1, p. 88-109.

२५. **Pattanaik B. K.** and Singh Madan Mohan (March 2007) : *Rural Household Sanitation and its Influencing Factors, Man & Development*, Volume 29, no. 1, pp. 131 to 157.

२६. **कांबळे राजेंद्र (जून २००६)** : नवव्या पंचवार्षीक योजनेच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा सामाजिक, राजकीय जीवनावर पडलेला प्रभाव : एक अभ्यास. हा पीएच. डी. पदासाठी शिवाजी विद्यापीठामध्ये सादर केलेला शोधप्रबंध.

***